219

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन,

# आदिवासी विकास विभाग

# मावळ तालुक्यातील कातकरी जमातीचे असल्याचा दावा करणाऱ्या कुटुंबाचा सर्वेक्षण अहवाल

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८, क्वीन्स गार्डन,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ 001
दूरध्वनी क्र. ०२०-२६३६२०७१, फॅक्स क्र. ०२०-२६३६००२६
Email - trti.mah@nic.in

# मावळ तालुक्यातील कातकरी जमातीचे असल्याचा दावा करणाऱ्या कुटुंबांचा सर्वेक्षण अहवाल



वि (वाय) ५७१—१

# प्रस्तावना

मावळ तालुक्यातील ३१४ अपील अर्जाच्या संदर्भात अनुसूचित जमाती प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याच्या दृष्टीने १४ गावातील २२८ कातकरी कुटुंबाच्या चालिरिती, आर्थिक स्थिती, व्यवसाय, निवास, आरोग्य, शिक्षण इत्यादी बाबतची प्रत्यक्ष सर्व्हेक्षणाद्वारे विविध पत्रकात माहिती संकलित केली. सदर संकलित केलेल्या माहितीचे श्री. के. एस. चव्हाण, उपसंचालक (एक्षेविका) यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सुरेश शिंदे, समन्वयक यांनी पृथ्थकरण, तक्तीकरण करुन अहवाल लेखन केले व कु. हेमा नांगरे, लिपीक तथा टंकलेखक यांनी टंकलेखनाचे काम केले.

सदर अहवाल मावळ तालुक्यातील कातकरींसाठी शासनाच्या विविध योजना राबविणाऱ्या प्रकल्प कार्यालय व इतर संबंधित कार्यालयांना उपयोगी पडेल, असे वाटते.

(राजेशकुमार),
आयुक्त,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.



वि (वाय) ५७१— १-अ

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| | प्रस्तावना | -- | |
| १. | कातकरी एक दृष्टीक्षेप | १ | २ |
| २. | कातकरी एक विदारक सत्य | ३ | ६ |
| ३. | राष्ट्रीय नमुना पाहणी नुसार दैनिक खर्च व कातकरी यांचे उत्पन्न एक खंत | ७ | ८ |
| ४. | सर्वेक्षणाचा उद्देश | ९ | १० |
| ५. | क्षेत्रीय पाहणी | ११ | १२ |
| ६. | पृथ्थ:करण (गावपत्रक) | -- | |
| | ६.१ कातकरी समाजासाठी गावातील सुविधा | १३ | १३ |
| | ६.२ कातकरी वस्तीमधील सुविधा | १३ | १५ |
| | ६.३ गावातील कातकरी समाजाचा व्यवसाय | १५ | १६ |
| | ६.४ संकीर्ण | १७ | १७ |
| ७. | पृथ्थ:करण (कुटुंबाची माहिती) | -- | |
| | ७.१ पाहणी केलेली गावे | १८ | १९ |
| | ७.२ कुटुंबाचे कायमचे स्थलांतर | २० | २० |
| | ७.३ कुटुंबाचे स्थानिक स्थलांतर | २० | २० |
| | ७.४ गावनिहाय कातकरी कुटुंबातील व्यक्तींची माहिती | २१ | २५ |
| ८. | निवासस्थाने/ घरकुले | -- | |
| | ८.१ निवास घरांची स्थिती व मालकी | २७ | २९ |
| | ८.२ घरकुल योजना | ३१ | ३१ |
| ९. | साक्षरतेबाबतची माहिती | ३३ | ३५ |
| १०. | उदरनिर्वाहाची साधने | -- | |
| | १०.१ कुटुंबाचे व्यवसाय | ३७ | ३७ |
| | १०.२ मुख्य व्यवसाय | ३९ | ४२ |
| | १०.३ दुय्यम (पुरक व्यवसाय) | ४३ | ४७ |
| ११. | उत्पन्न | -- | |
| | ११.१ कुटुंबाचे सरासरी वार्षिक व मासिक उत्पन्न | ४८ | ४८ |
| | ११.२ कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे सरासरी उत्पन्न | ४८ | ४९ |
| | ११.३ वार्षिक उत्पन्न निहाय कुटुंबाची वर्गवारी | ५१ | ५३ |
| १२. | पशुधन | -- | |
| | १२.१ कुटुंबाकडील पशुधन , शेळ्या,मेंढ्या, व कोंबडया | ५५ | ५९ |
| १३. | औषधोपचार पध्दती | -- | |
| | १३.१ विविध औषधोपचार स्वीकारणारी कुटुंबे | ६१ | ६१ |
| | १३.२ विविध कारणांसाठी दवाखान्यात जाणारी कुटुंबे | ६३ | ६३ |
| | १३.३ औषधोपचार पध्दतीनुसार कुटुंबाचे वर्गीकरण | ६५ | ६५ |
| १४. | कातकरी कुटुंबाकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे | ६७ | ६९ |
| १५. | शासकीय योजना राबविण्यात येणा-या अडचणी व उणिवा | ७० | ७० |
| १६. | कामावर होणारी फसवणूक व पिळवणूक | ७१ | ७८ |
| १७. | परिशिष्ट -अ गावपत्रक व कुटुंबपत्रक | ७९ | ९३ |
| १८. | परिशिष्ट -ब २३ मार्च १९९९ शासन निर्णय | ९४ | ९४ |

# १. कातकरी एक दृष्टीक्षेप

महाराष्ट्र राज्यातील तीन आदिम जमातीपैकी कातकरी ही एक अत्यंत मागासलेली आदिवासी जमात. ही जमात ठाणे, रायगड, सिंधुदूर्ग, नाशिक व पुणे या जिल्ह्यांमध्ये आढळते. कातकरी ही जमात राज्यातील स्थानिक जमात आहे. संकोची व भिडस्त स्वभाव, शिक्षणाचा गंधही नसलेली, नियोजनांचा अभाव, पिढ्यान्‌पिढ्या चारही पिढ्यानपिढ्या दारिद्र्यामुळे अन्नासाठी दाहीदिशा फिरणारा असा हा अत्यंत मागासलेला समाज आहे.

खैराच्या झाडापासून कात बनविणे हा त्यांचा पूर्व पारंपारिक व्यवसाय. परंतु वन विभागाचे जाचक नियम व बंधने तसेच नामशेष होत असलेली जंगले यामुळे त्यांचा हा व्यवसाय नामशेष झाला.

स्वत:च्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी जंगल उपज गोळा करुन त्याची विक्री करणे, लाकूड फाटा विकणे, मासेमारी करणे, रोजंदारी व मोलमजुरी करणे असे व्यवसाय कातकरी करतात. कायमस्वरुपी नसलेला रोजगार व मिळणारे तोकडे उत्पन्न यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती खूपच हालाखिची असते. त्यामुळे रोजंदारी व कामधंद्यासाठी त्यांना वारंवार तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतर करावे लागते.

ठाणे, रायगड व पुणे या जिल्ह्यातील बऱ्याच विटभट्ट्यांवर कातकरी मोलमजुरी करतात. त्यांचा संकोची व भिडस्त स्वभाव, आर्थिक परिस्थिती याचा विटभट्टी मालक फायदा घेतात व कमी रोजंदारीवर त्यांचेकडून कामे करुन घेतात. प्रसंगी त्यांना मारहाणही केली जाते. सधन वर्गाकडून कातकरीची पिळवणूक केली जाते.

कातकरी जमातीत अथावर, धेड किंवा ढोर, सिधी, सोन (मराठे) व वरप असे पाच पोटप्रकार आढळतात. कातकरी एकमेकांशी बोलताना **'कटाई बोली'** बोलतात.

कातकरी जमातीस कोणताही धर्म नाही, परंतु हिंदू धर्माचा कातकरी समाजावर प्रभाव आढळतो. ते वाघाला वाघदेव म्हणून संबोधतात. समस्त कातकरी समाजावर वाघदेवाची विशेष कृपा असल्याने तो कातकऱ्यांना त्रास देत नाही अशी त्यांची श्रध्दा आहे. त्यामुळे वाघदेव हे त्यांचे आराध्य दैवत, त्याचबरोबर मावल्या म्हशा, वेताळ, जरीमरी, हिरवा ही कातकऱ्यांची दैवते होत. कातकरी समाज भूतपिशाच्च यावर खूप विश्वास ठेवतो व त्याला खूप घाबरतो. देवाला ते नारळ व कोंबडे वाहतात.

कातकरी पुरुष उघडे-बोडके फक्त कमरेला एक फडके गुंडाळलेले व स्त्रिया गुडघ्यापर्यंत आखूड लुगडे नेसणे अशी त्यांची पूर्व पारंपारिक वेशभूषा होती. परंतु काळाप्रमाणे बहुसंख्य कातकरी पॅन्ट व टी शर्ट वापरतात व स्त्रिया गोल साडी नेसतात.

कातकरी गावाबाहेर किंवा डोंगर पायथ्यास समूहाने राहतात. त्यास **"वाडी किंवा पाडा"** म्हणतात. त्यांच्या झोपड्या कारवीच्या काठ्यांच्या, शेणमातीने सारविलेल्या भिंतींच्या असतात. झोपडीचे छप्पर गवताने शेकारलेले असते. झोपडी साधारणपणे १०० ते ३०० चौ.फूट असते. झोपडीत स्वच्छता नसते, तसेच विजेची सुविधा नसते.

कातकरी समाज हा व्यसनाधीन समाज. कुटुंबातील स्त्री व पुरुष हे दोघेही दररोज दारू पितात. एकवेळ ते जेवणार नाहीत परंतु दारू पिणारच. कातकरी हे भविष्याच्या बाबतीत फार बेफिकीर असतात. आजचे आज व उद्याचे उद्या हा कातकरींचा हिशोब. माणसाने आवश्यक तेवढे कमवावे संच करू नये हे त्यांचे ढोबळ मत त्यामुळे बऱ्याच वेळा वेळेत रोजगार उपलब्ध न झाल्याने त्यांना उपासमारीची वेळ येते. परंतु त्यांना त्याची खंत नसते ते भीक मागत नाहीत. अज्ञान तसेच वस्तीच्या ठिकाणी पाणीटंचाई त्यामुळे दररोज आंघोळ करणे, कपडे धुणे, शारीरिक स्वच्छता या बाबतीत ते फारच उदासीन असतात. त्यामुळे परिणामी शारीरिक अस्वच्छतेमुळे त्वचा रोगाचे प्रमाण कातकरी जमातीत जास्त आढळते. पायापुरते पाहण्याची प्रवृत्ती त्यामुळे सामाजिक जाणीवतेचा पूर्ण अभाव त्यांच्यात दिसून येतो.

कातकरी समाजाच्या सांस्कृतिक चालिरीती, धार्मिक सणवार, लग्नविधी तसेच इतर विधी यावर हिंदू धर्माचा पगडा असल्याचे जाणवते. कातकऱ्यांमध्ये सर्व सण, विधी व कार्यक्रम हे हिंदू धर्मातील चालिरीती, रुढीनुसार पार पाडले जातात.

**प्रमुख सण व उत्सव.--** कातकरी समाजाचे प्रमुख सण म्हणजे बैलपोळा, होळी, शिमगा हे होय. होळीच्या सणाच्या दिवशी मोठा उत्सव साजरा केला जातो. तसेच भाद्रपद अमावस्या हा पितरसण पाळला जातो.

**जाती जमाती देवता.--** भैरी, काळूबाई, वाघोबा, वाघजाई, कातकरी हे डोंगरात राहत असल्याने डोंगरात जंगलात असलेले वाघ हे आपणास काही त्रास देत नाहीत ते आपले संरक्षण करतात अशी कातकरी समाजाची समज असल्याने वाघोबा हे त्यांचे दैवत समजून त्यांची पूजा करतात.

**धार्मिक विधी - जन्माबाबत.--** बाळंतपण हे घरीच अनुभवी वयस्कर नातेवाईक स्त्रीमार्फत केले जाते. बाळाच्या जन्मानंतर सुयीणीमार्फत पाचवी पुजली जाते. डाळ भाताचे जेवण दिले जाते. हरभरा, वाटाणा, चवळीच्या घुगऱ्या वाटण्यात येतात.

**मृत्यूबाबत.--** हिंदू धर्माप्रमाणे विधी केले जातात. पूर्वी दहन केले जात होते. पण लाकूड टंचाईमुळे आता दफन करतात. दशक्रिया विधी व तेरावा केला जातो.

**विवाहाबाबत -**

१. हळद लावणे, मंगलअष्टका म्हणणे, मणी मंगळसूत्र बांधणे, इत्यादी सर्व विधी हिंदू धर्मातील रितीरिवाजानुसार केले जातात.


२. मुलाकडून मुलीच्या नातेवाईकांना हुंडा दिला जातो. तांदूळ, डाळ, रोख रक्कम या स्वरूपात हुंडा दिला जातो.

३. एकाच आडनावाच्या घरात लग्न संबंध होत नाहीत. शक्यतो नात्यात मुली देत नाहीत.

४. लग्नापूर्वीचे तसेच विवाहबाह्य संबंध निषिध्द मानले जातात.

<u>२. कातकरी एक विदारक सत्य</u>

मावळ तालुक्यातील कातकरी ही जमात आदिम जमातीपैकी एक जमात असली तरी, त्यांची आर्थिक परिस्थिती आदिम जमातीपेक्षा बिकट असल्याचे विदारक सत्य पाहणीत आढळले.



शहराजवळील तसेच हमरस्त्यालगतच्या गावातील उदा. राऊतवाडीसारख्या गावातील पाड्यावर राहणाऱ्या कातकरी कुटुंबाची परिस्थिती थोडी फार बरी आहे. परंतु धरणालगत राहणाऱ्या शिळींब, जवन, कोटमवाडी, कोळेचाफेसर गावातील कातकरी समाजाची स्थिती खूपच भयानक आहे. पशुच्या जीवनापेक्षाही या कातकरींचे जीणे भयानक आहे.

ज्या मालकाकडे मोलमजुरी करावयाची, त्याचे जागेत झोपडी टाकावयाची व त्याने दिलेल्या मजुरीवर पोट भरावयाचे शिवनीसारख्या गावात विटभट्टीवर काम करणाऱ्या कातकरी कुटुंबातील व्यक्तींना सरासरी ३० ते ५० रुपये रोज दिला जातो. तसेच इतर किरकोळ कामे फुकट करुन घेतली जातात. काम करणे नाकारल्यास झोपडी तोडून टाकण्याची धमकी दिली जाते. तसेच दुसऱ्या ठिकाणी रोजंदारीस जाण्यास मज्जाव केला जातो.

शासनाकडून काही कुटुंबाना घरकुले दिली आहेत. संबंधित यंत्रणेतील भ्रष्टाचार अधिकारी व ठेकेदार याचे साटेलोटे त्यामुळे घरकुलाच्या कामाचा दर्जा अत्यंत खालावलेला आढळतो.

घरकुलांना दरवाजे नाहीत, कोणत्याही घरकुलात वीज नाही, फरश्या बसविलेल्या नाहीत, खिडक्यांना दारे नाहीत, प्लॅस्टर केलेले नाही. अशा असंख्य उणीवा घरकुलामध्ये आढळल्या आहेत.

काही गावामध्ये कातकरींना दिलेली घरकुले स्थानिक लोकांनी बळकावली असून, त्यामध्ये जनावरे तसेच वैरण, भात ठेवल्याचे आढळले. मौजे शिवनी येथे सदर घरकुले शेतकऱ्यांनी त्यांच्या खाजगी जागेत बांधल्याचे स्थानिक व्यक्तीकडून समजले.


घरकुल नसणाऱ्या कातकरी कुटुंबाच्या झोपड्या पाहिल्या असता त्या झोपड्यांची अवस्था जनावरांच्या गोठ्यापेक्षा वाईट असल्याचे दिसून आले. झोपडी डोंगर उताराच्या सपाटीवर बांधलेली आहे. झोपडीत वीज नाही, झोपडीवर कपडे, साड्या, झाडाच्या फांदया व पाने टाकलेली, झोपडीमध्ये सर्व अस्ताव्यस्त पडलेले. कोपऱ्यात दगडाची चूल, दहा-वीस चेमलेली, कळकटलेली जर्मलची/प्लॅस्टीकची भांडी पाण्यासाठी प्लॅस्टिकच्या एक ते दोन घागरी, जमिनीचा सर्व मुरुम उखडलेला, सर्व वापरण्याचे कपडे झोपडीवर टाकलेले, आंघोळीचा पत्ताच नाही. पाण्याचे दुर्भिक्ष त्यामुळे कपडे धुणे, आंघोळ, स्वच्छता याकडे दुर्लक्ष. पिण्यापुरते पाणी आणणे, रात्री दारु पिवून येताना भजी, वडापाव आणणे, वडापाव खाणे व झोपणे, सकाळी उठून कामाला जाणे असा नित्यनियम. काम न मिळाल्यास दारु पिणे, मासे, खेकडे पकडणे ते विकणे व गुजराण करणे.

कातकऱ्यांकडे कोणतीही स्थावर मालमत्ता नाही. लहान मुलांना दूध विकत घेऊन पाजण्याची आर्थिक क्षमता नाही. आईच्या अंगावर पिणे, मुलांना कोणत्याही प्रकारचे जीवनसत्व असलेला पौष्टीक आहार नाही. त्यामुळे मेळघाटाप्रमाणे मावळ तालुक्यातसुध्दा काही प्रमाणात कुपोषण आढळते.

सर्व जीवनावश्यक वस्तुंचे भाव गगनाला भिडले आहेत. डाळी, कडधान्याचे भाव किलोस ६० ते ९० रुपयांपर्यंत आहेत. कातकरी लोकांचे मुख्य खाद्य भात. परंतु तांदळाचे भावही किलोस साधारणपणे २० ते २५ रुपये, ज्वारी ३० ते ३५ रुपये किलो अशा परिस्थितीत पाणीयुक्त डाळींचे वरण व भात असा आहार घेताना कातकरी कुटुंबे आढळली.

रोजगारासाठी खूप भ्रमंती, अतोनात काबाडकष्ट परंतु, आर्थिक लाभ कमी, रोजंदारीत फसवणूक त्यामुळे पौष्टिक आहाराचा सातत्याने अभाव, व्यसनाधिनता त्यामुळे कातकरींचे आयुष्यमान कमी आढळले. कुटुंबामध्ये असलेल्या वृध्द व्यक्तीची परिस्थिती खूपच हालाखीची होती. अकाली वृध्दत्त्व, चालता न येणे, दिसत नसणे, अंगावर फाटके कपडे, खुरटी दाढी, डोक्यावर वाढलेले केस, लाल पिवळे दात, मिचमिचते डोळे, हातापायावर झालेले विविध विकार अशा परिस्थितीत हताश होऊन झोपडीत मिरचीची पाणीदार डाळ, आमटी व भात खात बसलेले वृध्द स्त्री-पुरुष आढळले.

कातकरी कुटुंबास टुथपेस्ट माहीत नाही, अंगाचे कपड्याचे ब्रँडेड साबण माहीत नाहीत, इतर साबण खरेदी करण्याची आर्थिक क्षमता नाही, पाण्याच्या दुर्भिक्षामुळे आंघोळ नाही, पायात पादत्राणे नाहीत, सर्व पायी प्रवास अशी सत्य परिस्थिती पाहणीत आढळली.



## ३. राष्ट्रीय नमुना पाहणीनुसार दैनिक खर्च व कातकरी यांचे उत्पन्न एक खंत

राष्ट्रीय नमुना पाहणी तसेच योजना आयोगाने प्रसिध्द केलेल्या आकडेवारीनुसार ग्रामीण भागात प्रत्येक व्यक्तीस आपल्या दैनिक किमान गरजा भागविण्यासाठी येणारा खर्च व पाहणी केलेल्या कातकरींचे व्यक्तीनिहाय दैनिक उत्पन्न याची आकडेवारी खाली दर्शविलेली आहे.


| *अ.क्र.* | *तपशील* | *रुपये* |
|---|---|---|
| १. | राष्ट्रीय नमुना पाहणीनुसार ग्रामीण भागात प्रत्येक व्यक्तीस येणारा दैनिक किमान खर्च रुपये (दैनिक लोकमत दि. ३०/४/१२) | ३५.१० |
| २. | योजना आयोगानुसार ग्रामीण भागात प्रत्येक व्यक्तीस येणारा दैनिक किमान खर्च रुपये (दैनिक पुढारी दि. ३०/४/१२) | २२.४२ |
| ३. | पाहणी केलेल्या २२८ कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे सरासरी दैनिक उत्पन्न रुपये | १४.२० |

राष्ट्रीय नमुना पाहणीनुसार ग्रामीण भागात प्रत्येक व्यक्तीला खर्चासाठी किमान दररोज रु. ३५.१० लागतात. त्यानुसार ग्रामीण भागात दरमहा १०५४ रु. पेक्षा कमी खर्च करणारी व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली येते. (दैनिक लोकमत दि. ३०/४/२०१२).

डॉ. मनमोहन सिंग यांचें अध्यक्षतेखाली योजना आयोगाने देशात ग्रामीण भागात दैनंदिन खर्चासाठी रु. २२.४२ इतका खर्च येतो, असे प्रसिध्द केले आहे. (दैनिक पुढारी दि. ३०/४/२०१२).

यावरुन राष्ट्रीय नमुना पाहणी व योजना आयोगाने प्रसिध्द केलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या किमान दररोज खर्चाच्या आकडेवारीपेक्षा कातकरींचे दैनिक प्रती व्यक्ती उत्पन्न किमान ८ रुपये व जास्तीत जास्त २०.९० रुपये इतके कमी आहे.

यावरुन कातकरी व्यक्तीची त्याचे दैनंदिनवरील १४.२० रुपये सरासरी दैनिक उत्पन्नातील निम्मी रक्कम ही नियमित दारु पिण्यासाठी खर्च होत असते, ही बाब विचारात घेता अन्न, वस्त्र व निवारा याबाबतच्या किमान गरजा ते कधीही भागवू शकत नाही हे त्रिवार सत्य आहे. त्यामुळे सर्व कातकरी हे दारिद्र्यरेषेखाली येतात.



## ४. सर्वेक्षणाचा उद्देश

मावळ तालुक्यातील २१ गावामध्ये पिढ्यान्पिढ्या राहणारे आदिवासी कातकरी यांनी त्यांना जमातीचे दाखले मिळावेत यासाठी एकूण ३१४ प्रकरणे मंडल निरीक्षक यांचेमार्फत तहसीलदार मावळ यांचेकडे दाखल केली होती. परंतु मावळ प्रांत यांचेकडून खालील कारणामुळे प्रकरणे नाकारण्यात आली.

१. १९५० वर्षापूर्वीचा कातकरी असल्याचा पुरावा.
२. मावळ तालुक्यातील कातकरी जमातीचे अधिसूचित नाही.
३. पूर्वीचे स्थलांतराबाबत सक्षम अधिकाऱ्याचे दाखले इत्यादी.

अशा अनेक कारणासाठी जमातीचे दाखले नाकारण्यात आले असल्याचे अध्यक्ष, आदिवासी कातकरी समाज संघटना, ठाकुरसाई, तालुका मावळ यांनी त्यांचे दि. १३ ऑगस्ट, २०१० चे परिशिष्ट-अ चे अपील अर्जान्वये पत्राने कळविले. तसेच उपविभागीय अधिकारी, मावळ यांचे आदेश रद्द करून दाखले निर्गमित करण्याबाबत आदेश देण्याची विनंती केली.

कातकरी व आदिम जमातीच्या लोकांना जमातीचे दाखले मिळावेत त्यासाठी वरील जमातीच्या लोकांनी अर्ज केल्यावर संबंधित तहसील कार्यालये व प्रकल्प कार्यालयातील अधिकाऱ्यांनी त्या समाजाच्या पाड्यांना भेटी देऊन दाखला मागणारी व्यक्ती ही आदिवासी जमातीची आहे असे प्रमाणित करून ती कागदपत्रे संबंधित तहसील कार्यालयास सादर करून त्यांना दाखले मिळवून देण्याबाबत कार्यवाही करावी असे शासनाने (आदिवासी विकास विभागाने) दि. २३ मार्च, १९९९ चे पत्रान्वये जिल्हाधिकारी व संबंधित प्रकल्प अधिकारी यांना निर्देश देण्यात आले होते. तसेच वरील जमातीला सरपंच, पंचायत समिती सदस्य, पोलीस पाटील यांनी दिलेले रहिवासी दाखले, जातीचे प्रमाणपत्र देण्यास ग्राह्य धरण्यास हरकत नाही, असे वरील संदर्भिय पत्रात नमूद केले आहे ( परिशिष्ट-ब ). त्यास अनुसरून मावळ तालुक्यातील ३१४ अपील अर्जाच्या संदर्भात जमाती प्रमाणपत्राचे अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याच्या दृष्टीने २१ गावातील कातकरी कुटुंबाची त्यांचे वाडी / पाड्यांवर जाऊन प्रत्यक्ष सर्वेक्षणाद्वारे विविध प्रपत्रामध्ये त्यांच्या रुढी, परंपरा, चालीरिती इत्यादीबाबतची माहिती संकलित करण्याचे निश्चित केले.

**आदिवासी कातकरी कुटुंब**



## ५. क्षेत्रीय पाहणी

मावळ तालुक्यातील कातकरी कुटुंबाच्या सर्वेक्षण संदर्भात वाड्या / पाड्यांना भेटी देऊन प्रत्यक्ष सर्वेक्षणाद्वारे माहिती गोळा करण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेतील अधिकारी व कर्मचारी अशा नऊ व्यक्तींचे अभ्यास पथक नियुक्त करण्यात आले.

खालील अभ्यास पथकाने दि. ९ मे, २०११ ते १३ मे, २०११ या कालावधीत मावळ तालुक्यातील संबंधित १४ गावातील २२८ कातकरी कुटुंबाची माहिती संकलित केली.

| *अ.क्र.* | *अधिकारी / कर्मचारी नाव* | *पदनाम* |
|---|---|---|
| १. | श्रीमती. ए. स. काळे | संशोधन अधिकारी |
| २. | श्री. रमेश रघतवान | सांस्कृतिक अधिकारी |
| ३. | श्री. विजय डगळे | सांख्यिकी सहाय्यक |
| ४. | श्रीमती. एस. व्ही. बोंबले | सांख्यिकी सहाय्यक |
| ५. | श्री. मजहर खान | कनिष्ठ लिपिक |
| ६. | श्री. डी. एस. ढोरकुले | कनिष्ठ लिपिक |
| ७. | श्री. एस. जे. शिंदे | समन्वयक |

सदर सर्वेक्षणामध्ये कातकरी कुटुंबाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक इत्यादी बाबींशी निगडीत अशी माहिती कुटुंब पत्रकात गोळा केली.



## ६. पृथः करण (गावपत्रक)

## ६.१ कातकरी समाजासाठी गावात असलेल्या सामाजिक सुविधा

मावळ तालुक्यातील १४ गावातील २२८ कातकरी कुटुंबाची दि. ९/५/२०११ ते दि. १३/५/२०११ या कालावधीत संस्थेच्या पथकाकडून पाहणी करण्यात आली. गावाशी संबंधित माहिती गावपत्रकातून व कुटुंबाची माहिती कुटुंबपत्रकात संकलित केली.

कातकरींसाठी गावात असलेल्या सामाजिक सुविधांबाबतची गावपत्रकात संकलित केलेली माहिती खालीलप्रमाणे आहे.

१. **समाजमंदिर.--** पाहणी केलेल्या १४ गावांपैकी फक्त मौजे कोटमवाडी या गावात समाजमंदिर होते.

२. **स्मशानभूमी.--** पाहणी केलेल्या १४ गावांमध्ये एक ही गावात कातकरीसाठी त्यांचे पाड्यालगत स्मशानभूमी बांधण्यात आलेली नाही, असे आढळले.

३. **पिण्याच्या पाण्याचे स्रोत.--** पाहणी केलेल्या कातकरी पाड्यांवर पिण्याचे पाण्यासाठी नळ कोंढाळे, हापसा, ओढ्याचे पाणी, झऱ्याचे पाणी, नदी व धरणाचे पाणी हे स्रोत आढळले.


**पाणी योजना.--** शिळींब कोटमवाडी, कोळे चाफेसर, या गावात पाणीपुरवठा योजना केलेल्या आढळल्या. परंतु त्या सर्व अर्धवट स्वरूपात होत्या. टाकीचे निकृष्ट बांधकाम, फुटके पाईप, तुटलेली वीज जोडणी, यावरून पाणीपुरवठा योजना पूर्ण बंद असल्याचे दिसले. बऱ्याचशा गावात कातकरी महिला साधारण १ कि.मी वरून पाणी डोक्यावरून आणताना आढळल्या. कातकरी काही वाड्यालगतचा पाण्याचा साठा संपल्यावर धरणालगत स्थलांतरित होतात (मे, जून महिन्यात) असे पाहणीत आढळले.

धरणालगतच्या गावातील कुटुंबे धरणाचे पाण्यावर अवलंबून असल्याचे आढळले.

## ६.२ गावातील कातकरी वस्तीवरील सुविधा

(१) **पाणी.--** सर्वेक्षित गावातील पाड्यांवर पाण्याचे दुर्भिक्ष आढळले. राऊतवाडी, आंबेगाव ही गावे सोडून इतर गावांत पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत हे पाड्यापासून अर्धा ते एक किमी दूर असल्याचे आढळले. सर्वेक्षित बहुसंख्य गावे ही पवना धरणाच्या पाणलोट क्षेत्राच्या कडेला वसलेली आहेत. त्यामुळे उन्हाळ्यात वस्तीवरील पिण्याच्या पाण्याचे स्रोत आटल्यावर ही कुटुंबे धरणामधील पाणलोट क्षेत्रात उपलब्ध पाण्याजवळ स्थलांतरित होत असल्याचे समजले व इतर वेळी ती मूळ जागेवरच राहतात.

काही गावात पिण्याच्या पाण्यासाठी असलेल्या पाड्यावरील योजना पूर्ण बंद पडलेल्या आढळल्या. पाईप उखडलेले, फुटके पाईप, तुटलेल्या वीज जोडण्या आढळल्या. त्यामुळे सदरील कुटुंबाना सर्वस्ती नदी, विहिर, ओढ्यावरून डोक्यावरून पाणी आणणे हा एकमेव पर्याय असल्याचे दिसले.



(२) **वीज.--** बहुसंख्य गावातील कातकरी पाड्यांवर सार्वजनिक वीजेची सोय आढळली. पाड्यावर वीजेचे खांब दिलेले आहेत. परंतु कोणत्याही कातकरी कुटुंबाकडे घरगुती वीजपुरवठा तसेच घरगुती मीटर कोठेही दिसले नाहीत. आंबेगावचे सरपंच कातकरी महिला असल्याने त्यांचे घरी वीजेची सोय आढळली.

(३) **अंतर्गत रस्ते.--** काही पाड्यावरील रस्ते हे पक्के व कायमस्वरूपी आढळले. काही पाड्यावर कच्चे रस्ते आढळले.

(४) **दळणवळणाची साधने.--** जी गावे शहरालगत व मुख्य रस्त्यावर आहेत अशा गावात दळणवळणाची साधने (एस.टी, रिक्षा, जीप) उपलब्ध आहेत. परंतु जी गावे डोंगरमाथ्यावर डोंगर दरीत आहेत व मुख्य रस्त्यापासून दूर आहेत उदा. शिळींब, जवन, कोटमवाडी, कोळेचाफेसर अशा काही गावात दिवसातून १ ते २ वेळा एस.टी बस येते व इतर वाहतुकीची साधने ही फार कमी प्रमाणात आहेत. अशा गावातील कातकरींना त्यांच्या अत्यावश्यक गरजा भागविण्यासाठी औषधोपचार इत्यादी कारणांसाठी शहरात जाणे शक्य होत नसल्याचे पाहणीमध्ये आढळले.

(५) **गटारे.--**चौदा गावातील कातकरी पाड्यांमध्ये सांडपाण्यासाठी गटारे बांधलेली नाहीत. सर्व पाड्यांवर सांडपाणी दारात किंवा घराच्या पाठीमागे सोडल्याचे आढळले.

(६) **शौचालये.--** वरील चौदा गावातील कातकरी हे शौचालयाचा वापर करीत नसल्याचे आढळले. कोळेचाफेसर गावात शौचालयाची योजना राबविण्यात येऊन शौचालये बांधण्यात आली. परंतु त्यांचे बांधकाम पूर्ण निकृष्ट दर्जाचे आहे. सर्व बांधकाम पडण्याच्या अवस्थेत आहे. काही शौचालयात भांडीसुध्दा बसविलेली नाहीत. कोळेचाफेसर या गावातील पाड्यावरील शौचालयाची अवस्था ही अधिकारी ठेकेदार यांचे हितसंबंधाचे देण्याघेण्याचे ज्वलंत उदाहरण आहे. वास्तविक हा पाडा डोंगर दरीत जंगलात व मुख्य रस्त्यापासून खूप दूर आहे. अशा पाड्यावरील पाणीपुरवठा, शौचालय बांधकाम अशा योजनाचा पूर्ण बोजवारा उडालेला आढळला.


## ६.३. कातकरी समाजाचा व्यवसाय

सर्वेक्षित १४ गावातील कातकरी हे भूमिहीन आहेत. बहुसंख्य कातकरी समाजाचा व्यवसाय शेतमजुरी, मोलमजुरी, वीट-भट्टीवर मजुरी हा आहे. सर्व कुटुंबे ही अशिक्षित असल्यामुळे त्यांना कायमचा रोजगार उपलब्ध होत नाही.

काही कुटुंबे वीटभट्टीवर वीटा पाडण्याचे काम करतात. या कामासाठी ते वीट भट्टीवर तात्पुरते स्थलांतरीत होतात. राहण्यास स्वत:ची जागा नसल्याने ते वीटभट्टीच्या मालकाच्या जागेतच वास्तव्य करतात. वीटा पाडणे व वीटभट्टीवरील इतर कामामध्ये मालकाकडून त्यांची पिळवणूक होते. नियमित मजुरी दिली जात नाही, ठरलेल्या मजुरीपेक्षा कमी पैसे दिले जातात व काम मात्र जास्त करून घेतले जाते.

काही गावातील कुटुंबातील व्यक्ती डोंगरमाथ्यावर, लोणावळ्याजवळील नर्सरीमध्ये कामाला जातात तसेच काही लोक सुरक्षारक्षक म्हणून काम करतात. डोंगर माथ्यावर चालू असलेल्या गृहप्रकल्पामध्ये कातकरी तरुण वर्ग कामाला जात असल्याचे दिसले. (उदा. सहारा प्रकल्प). तर काही व्यक्ती लोणावळ्याजवळील धनिक व्यक्तीच्या बंगल्यावर काम करत असल्याचे आढळले.

**कातकरी कुटुंबे शेतमजुरीचे (भात लावणी ) काम करत असताना**



## ६.४. संकीर्ण

**शासकीय योजनांचे लाभ.--** आदिवासी विकास विभाग व इतर खात्याकडून कातकरींसाठी ज्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात, त्यातील किती योजना सदरील भागात कातकरी कुटुंबासाठी राबविण्यात आल्या व त्यापासून कातकरी कुटुंबांना काय फायदा झाला याची पाहणी केली असता सदर पाहणीमध्ये घरकुल योजना वगळता इतर कोणत्याही योजना राबविलेल्या नसल्याचे आढळले. घरकुल योजना ही आदिवासी विकास विभागाने राबविलेली नसल्याचे पाहणीत आढळले. सदरील योजना महसूल विभाग जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून राबविण्यात आलेली आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्थेवर कातकरी नेमणुका.--** वरील चौदा गावांपैकी मौजे आंबेगाव या ग्रामपंचायतीची स्त्री सरपंच म्हणून सौ. भिकाबाई जाधव या कातकरी महिलेची निवड झालेली आहे. पाहणी केलेल्या कुटुंबांमधील एकही व्यक्ती सरकारी नोकरीत किंवा शासकीय पदावर नसल्याचे आढळून आले.


पाहणी केलेल्या गावातील सहकारी संस्थामध्ये कातकरींचा सहभाग आढळून आला नाही.

## ७. पृथःकरण (कुटुंबपत्रक)

**७.१. पाहणी केलेली गावे व कातकरी कुटुंब संख्या--** मावळ तालुक्यातील १४ गावातील २२८ कातकरी कुटुंबाची प्रत्यक्ष सर्वेक्षण माहिती संकलित केली त्या कातकरी कुटुंबाचे गावनिहाय वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे :--

| अ.क्र. | गावाचे नाव | जनगणना क्रमांक (२००१ नुसार) | सर्वेक्षित कातकरी कुटुंबांची संख्या |
|---|---|---|---|
| १. | राऊतवाडी (करुंज) | ८५९ | ३० |
| २. | खडकवाडी (शिवली) | ८७० | २४ |
| ३. | पवनानगर | ८५० | ४ |
| ४. | ठाकुरसाई | ८७९ | २ |
| ५. | कोर्थुणे | ८७१ | ७ |
| ६. | महागाव | ८५३ | ७ |
| ७. | मलवडी | ८४३ | ४ |
| ८. | वारु | ८८० | ४ |
| ९. | आंबेगाव | ८५० | २४ |
| १०. | आपटी | ८४५ | ४ |
| ११. | शिळींब | ८८९ | २८ |
| १२. | जवन | ८९१ | १८ |
| १३. | कोटमवाडी | ८८७ | ३८ |
| १४. | कोळेचाफेसर | ८७५ | ३४ |
| एकूण | | -- | २२८ |

# मावळ तालुक्यातील पाहणी केलेली गावे




Based upon Survey of India map with the permission of the Surveyor General of India.

© Government of India Copyright, 2006

## ७.२. कुटुंबाचे कायमचे स्थलांतर

वरील सर्वेक्षणाद्वारे संकलीत केलेल्या माहितीची छाननी करुन विविध तक्त्यात तक्तीकरण केले व खालीलप्रमाणे बाबनिहाय पृथ:करण करण्यात आले.

**कुटुंबाचे कायमचे स्थलांतर.**--मावळ तालुक्यात स्थायिक झालेल्या सर्व कातकरी कुटुंबापैकी सर्वेक्षित कुटुंबे स्वत:च्या व कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी कोकणातून तसेच रायगड जिल्ह्यातील पाली, पोलादपूर, रोहा व इतर तालुक्यातून साधारणपणे ५० ते १०० वर्षापूर्वी मावळ तालुक्यात मूळगाव सोडून आले आहेत. या स्थलांतरित कुटुंबाचे वर्षनिहाय वर्गीकरण खाली दर्शविले आहे.

**मूळगाव किती वर्षापूर्वी सोडले**

| अ.क्र. | वर्ष | कुटुंबाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ०-१० | १ | ०.५० % |
| २. | ११-२० | ४ | २ % |
| ३. | २१-३० | ३ | १% |
| ४. | ३१-४० | १५ | ६ % |
| ५. | ४१-५० | ६२ | २७% |
| ६. | ५१-६० | ५९ | २६ % |
| ७. | ६१-७० | ३२ | १४ % |
| ८ | ७१-८० | ३९ | १७ % |
| ९. | ८१-९० | ७ | ३% |
| १०. | ९१-१०० | ६ | ३% |
| | एकूण | २२८ | १००% |

एकूण सर्वेक्षित २२८ कुटुंबापैकी ६२ कुटुंबे दोन पिढ्यापूर्वी म्हणजे साधारण ५० वर्षापूर्वी मूळ गाव सोडून मावळ तालुक्यात स्थलांतरीत झाली आहेत.

सर्वात कमी म्हणजे १ कुटुंब २० वर्षापूर्वी स्थलांतरीत झाले आहे व ६ कुटुंबे ४ पिढ्यांपूर्वी म्हणजे १०० वर्षापूर्वी स्थलांतरीत झाली आहेत.

## ७.३. स्थानिक स्थलांतर

मावळ तालुक्यात कायमची स्थलांतरीत झालेल्या एकूण २२८ कुटुंबापैकी ५४ कुटुंबे इतर ठिकाणी तात्पुरते स्थलांतरीत झालेली आढळली. दरवर्षी सर्वसाधारण हिवाळा व उन्हाळा या ऋतूत साधारणपणे ६ ते ८ महिन्याच्या कालावधीत बरीच कुटुंबे उदरनिर्वाहासाठी मावळ तालुक्यातील इतर गावामध्ये स्थलांतरीत होतात. या कालावधीत ते वीटभट्टीवर वीटा पाडणे इतर अनुषंगिक मजुरीची कामे करतात या कालावधीत ते वीटभट्टीवर झोपड्या बांधून राहतात व पावसाळ्यात ते मूळगावी परत येतात. पावसाळ्यात भात लावणी, इतर शेतीची कामे करतात.

शिक्षणाचा अभाव त्यामुळे कोणतेही भवितव्य नाही. रोजची भ्रांत अशा शाश्वत रोजगार त्यामुळे मिळेल ते काम करतात. भिडस्त अबोल स्वभाव, घाबरटपणा, जागा सोडावी लागेल किंवा मारहाण होईल या भितीने मिळेल त्या कमी मजुरीत काम करणे, यामुळे स्थानिक मालक व वीटभट्टी मालक यांचेकडून कायमची कातकरींची पिळवणूक होत असल्याचे आढळले.

**शेती .**--एकूण २२८ कातकरी कुटुंबापैकी फक्त जवन गावातील एका कुटुंबाकडे वनखात्याची अतिक्रमीत दोन एकर शेतजमीन तो कसत असल्याचे आढळले. उर्वरित सर्व २२७ कातकरी कुटुंबे भूमिहीन आढळली.

## ७.४. पाहणी केलेल्या कातकरी कुटुंबातील व्यक्तींची गावनिहाय संख्या

पाहणी केलेल्या २२८ कुटुंबातील प्रौढ व्यक्ती, मुले यांची गावनिहाय संख्या खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.

### गावनिहाय कुटुंबातील व्यक्तींची माहिती

| अ.क्र. | गावाचे नाव | सर्वेक्षित कुटुंबाची संख्या | कुटुंबातील व्यक्ती | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रौढ व्यक्ती | | | मुले | | | कुटुंबातील एकूण व्यक्ती | प्रति कुटुंब सरासरी व्यक्ती | एकूण सरासरी मुले | सरासरी १०० पुरुषामागे स्त्रियांचे प्रमाण |
| | | | स्त्रिया | पुरुष | एकूण | स्त्रिया | पुरुष | एकूण | | | | |
| १ | करुंज | ३० | ४४ | ४८ | ९२ | ३७ | ४२ | ७९ | १७१ | ७ | ३ | ९१ |
| २ | शिवली | २४ | २९ | ३२ | ६१ | ३० | ३३ | ६३ | १२४ | ५ | ३ | ९१ |
| ३ | पवनानगर | ४ | ५ | ३ | ८ | ८ | ६ | १४ | २२ | ४ | ३ | १६६ |
| ४ | ठाकुरसाई | २ | ५ | ५ | १० | ४ | १ | ५ | १५ | ७ | ३ | १०० |
| ५ | कोर्थुणे | ७ | ११ | १२ | २३ | ११ | ७ | १८ | ४१ | ४ | ३ | ९५ |
| ६ | महागाव | ७ | ११ | ११ | २२ | ७ | ५ | १२ | ३४ | ५ | २ | १०० |
| ७ | मलवडी | ४ | ५ | ५ | १० | ५ | ५ | १० | २० | ५ | ३ | १०० |
| ८ | वारु | ४ | ८ | ९ | १७ | ३ | ५ | ८ | २५ | ६ | २ | ८९ |
| ९ | आंबेगाव | २४ | २९ | ३२ | ६१ | २३ | ३० | ५३ | ११४ | ५ | २ | ९१ |
| १० | आपटी | ४ | ६ | ७ | १३ | २ | ५ | ७ | २० | ५ | २ | ८० |
| ११ | शिळींब | २८ | ३६ | ३८ | ७४ | ३२ | ३५ | ६७ | १४१ | ५ | २ | ९५ |
| १२ | जवन | १८ | २५ | २५ | ५० | २४ | १८ | ४२ | ९२ | ५ | २ | १०० |
| १३ | कोटमवाडी | ३८ | ६२ | ६१ | १२३ | २९ | ३४ | ६३ | १८६ | ५ | २ | १०० |
| १४ | कोळेचाफेसर | ३४ | ४३ | ४६ | ८९ | २७ | ३५ | ६२ | १५१ | ४ | २ | ९३ |
| | एकूण | २२८ | ३१९ | ३३४ | ६५३ | २४२ | २६१ | ५०३ | ११५६ | ५ | २ | ९६ |


वरील तक्त्यावरुन पाहणी केलेल्या २२८ कातकरी कुटुंबामध्ये एकूण ११५६ व्यक्ती आढळल्या (प्रौढ व्यक्ती +मुले) त्यापैकी ३१९ स्त्रिया (२८%) ३३४ पुरुष (२९%) व ५०३ (४३ %) मुले आढळली आहेत.

एकूण ६५३ व्यक्तींपैकी ३१९ स्त्रिया (४८%) व ४९५ (५२%) पुरुष आढळले आहेत. वरील पाहणीमध्ये प्रौढांमध्ये स्त्रियांपेक्षा पुरुष ४% जास्त आढळले.

एकूण ५०३ मुलांपैकी २४२ मुली (४८%) व २६१ मुलगे (५२%) आढळले. मुलींपेक्षा मुलगे ४ % जास्त आढळले.

पाहणी केलेल्या २२८ कातकरी कुटुंबामध्ये प्रत्येक कुटुंबामागे सरासरी पाच व्यक्ती असल्याचे आढळले. करुंज (राऊतवाडी) या गावात इतर गावातील कुटुंबापेक्षा जास्त म्हणजे प्रत्येक कुटुंबात सहा व्यक्ती आहेत. तसेच सर्वात कमी म्हणजे कोथुर्णी गावात प्रत्येक कुटुंबामागे सरासरी चार व्यक्ती आहेत.

कुटुंबनिहाय मुलांचा विचार करता एकूण २२८ कातकरी कुटुंबामागे एकूण ५०३ मुले आढळली म्हणजे प्रत्येक कुटुंबात सरासरी २ मुले आढळली. करुंज (राऊतवाडी), शिवली (खडकवाडी), पवनानगर, ठाकुरसाई, कोथुर्णी, महागाव व मलवडी या गावातील कातकरी कुटुंबामध्ये प्रत्येकी सरासरी ३ मुले आढळली. तर उर्वरित आठ गावांमध्ये प्रत्येक कातकरी कुटुंबामध्ये सरासरी २ मूले आढळली.





## कातकरी कुटुंब



पाहणी केलेल्या २२८ कातकरी कुटुंबाचे वयानुसार वर्गीकरण खालील तक्यात दर्शविले आहे.

| अ. क्र. | तपशील | एकूण व्यक्ती (पुरुष + स्त्री) |
|---|---|---|
| १. | ० ते ५ वर्षापर्यंत | १९१ (१७ %) |
| २. | ६ ते १० वर्षापर्यंत | १७० (१५%) |
| ३. | ११ ते २० वर्षापर्यंत | १४२ (१२%) |
| ४ | २१ ते ३० वर्षापर्यंत | २५५ (२२%) |
| ५. | ३१ ते ४० वर्षापर्यंत | १७७ (१५%) |
| ६. | ४१ ते ५० वर्षापर्यंत | १३० (११%) |
| ७. | ५१ ते ६० वर्षापर्यंत | ६२ (६%) |
| ८. | ६१ ते ७० वर्षापर्यंत | २५ (२%) |
| ९. | ७१ वर्षापुढील | ४ (०%) |
| | **एकूण** | ११५६ (१००%) |

वरील तक्ता पाहता २२८ कुटुंबामध्ये २१ ते ३० वर्षापर्यंत सर्वात जास्त २२% व्यक्ती आढळल्या, त्यानंतर ० ते ५ वर्षापर्यंत १७ % व्यक्ती आढळल्या, सर्वात कमी व्यक्ती ६१ ते ७० वर्षापर्यंत २% व ७१ वर्षापुढील ०% व्यक्ती आढळल्या.




## ८. निवासस्थाने / घरकुले

सदर २२८ सर्वेक्षित कुटुंबापैकी १६९ कुटुंबाची घरे ही झोपडी स्वरूपात होती. त्यापैकी ४३ झोपड्या २५ % कौलाने शेकारलेल्या होत्या. उर्वरित १२६ झोपडया ७५% गवताने शेकारलेल्या होत्या. त्याचे घराचे क्षेत्र सरासरी २५० ते ३०० चौ. फूट आहे.


२२८ कुटुंबापैकी १६९ कुटुंबाची घरे ही खाजगी होती. ती स्वत: उभी केलेली होती व उर्वरित ५९ घरे ही घरकुले होती. ती शासनाच्या विविध विभागाकडून बांधून देण्यात आलेली होती.

**८.१ निवास घरांची स्थिती व मालकी.--** सर्वेक्षित २२८ कातकरी कुटुंबाच्या घराच्या मालकीचा विचार करता एकही कातकऱ्याने स्वत:च्या मालकीच्या जागेवर घर बांधलेले नव्हते. सदरहू २२८ कुटुंबाच्या घराच्या जागेची मालकी खालीलप्रमाणे--

| अ. क्र | घराचा प्रकार | घराच्या जागेची मालकीनिहाय वर्गीकरण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | खाजगी व्यक्ती | गावाची | गावठाण | वनविभाग | एकूण |
| १. | झोपडी | ५० (३०%) | ४६ (२७%) | ४९(२९%) | २४(१४%) | १६९(१००%) |
| २. | घरकूल | ० (०%) | २८ (४७%) | १८ (३१%) | १३ (२२%) | ५९ (१००%) |
| | **एकूण** | **५८ (२६%)** | **७४ (२९%)** | **६७(२९%)** | **३७ (१६%)** | **२२८(१००%)** |



# कातकरी झोपड्या






**८.२. घरकुल.--** एकूण २२८ कातकरी कुटुंबापैकी ५९ कातकरी कुटुंबांना शासनाकडून २५० चौ. फूटची घरकुले देण्यात आलेली आहेत. सदर घरकुलांची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर खालील त्रुटी प्रकर्षाने आढळून आल्या.

१. वाटप केलेल्या घरकुलाचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे आहे.
२. एकाही घरामध्ये वीज जोडणी दिलेली नाही.
३. बहुतांशी घरकुलामध्ये फरशी बसविलेली नव्हती.
४. काही घरकुलामध्ये आतून व बाहेरून प्लॅस्टर केलेले नव्हते व जे केलेले आहे त्याचा दर्जा निकृष्ट आहे.
५. काही गावातील घरकुलासोबत शौचालये बांधण्यात आली पण ती अपूर्ण अवस्थेत होती (विशेषत: कोळेचाफेसर गावात) व बांधकाम ढासळण्याच्या अवस्थेत होते.

एकूण या योजनेचा विचार करता घरकुल योजना संबंधित यंत्रणेकडून व्यवस्थित राबविलेली दिसत नाही. याबाबत पाठपुरावा व व्यवस्थित पर्यवेक्षण करण्यात आलेले नाही. संबंधित बांधकामाकडे हेतुपुरस्कर दुर्लक्ष केलेले आढळते, त्यामुळे सदर योजनेचा लाभार्थ्यांना फायदा झालेला दिसत नाही.

काही घरकुलांमध्ये राहणाऱ्या कातकरींना त्या घरकुलाजवळील शेतमालक, वीटभट्टीमालक, यांचेकडून कमी मजुरीत शेती व वीटभट्टीवर काम करण्यास जबरदस्ती केली जात असल्याचे कळले. जर आमच्याकडे कामाला न आल्यास तुमची घरकुले पाडून टाकू, तुम्हाला घरकुलामधून हाकलून देऊ अशा धमक्या गावातील शेतमालक व वीटभट्टीमालक यांचेकडून दिल्या जातात.

काही गावातील घरकुले त्या घरकुलाजवळ राहणाऱ्या स्थानिक लोकांनी बळकावलेली आढळली. त्या घरकुलांमध्ये स्थानिक लोकांनी जनावरे (गाई, म्हशी, बैल इ.) बांधलेली होती. काही घरकुलांमध्ये जनावरांचे खाद्य (वैरण, कडबा) ठेवण्यात आलेले आढळते.



## ९. साक्षरतेबाबतची माहिती

मावळ तालुक्यातील कातकरी जमातीचे असल्याचा दावा करणाऱ्या कुटुंबाचे सर्वेक्षण कुटुंबातील व्यक्तींची संख्या व साक्षर व्यक्तींची संख्या.


| अ.क्र. | तपशील | स्त्री | पुरुष | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | गावातील कुटुंबामध्ये एकूण व्यक्तींची संख्या (२० वर्षापुढील) | ३१९ | ३३४ | ६५३ |
| २. | एकूण मुलांची संख्या | २४२ | २६१ | ५०३ |
| ३. | एकूण व्यक्ती (व्यक्ती+मुले) | ५६१ | ५९५ | ११५६ |
| ४. | साक्षर व्यक्तींची संख्या (२० वर्षापुढील) | २६ | ४१ | ६७ |
| ५. | साक्षर मुलांची संख्या | ८९ | १०६ | १९५ |
| | एकूण | ११५ | १४७ | २६२ |
| ६. | साक्षर व्यक्तींची एकूण व्यक्तींशी टक्केवारी | ८% | १२% | १०% |
| ७. | साक्षर मुलांची एकूण मुलांशी टक्केवारी | ३६% | ४०% | ३९% |
| ८. | साक्षर व्यक्ती + मुले | ११५ | १४७ | २६२ |
| ९. | साक्षरतेचे प्रमाण टक्केवारी (एकूण व्यक्तींशी) | २०% | २४% | २३% |

पाहणी केलेल्या २२८ कातकरी कुटुंबामध्ये एकूण ४४२ स्त्रिया व मुली असून ५९५ पुरुष व मुले आहेत. वरील सर्वेक्षणामध्ये पुरुषांचे प्रमाण स्त्रियांपेक्षा ३५% टक्क्यांनी जास्त आहे.


वरील २२८ कुटुंबातील २० वर्षावरील स्त्रियांमध्ये फक्त ८% स्त्रिया साक्षर आहेत व पुरुषामध्ये १२% पुरुष साक्षर आहेत. एकूण १०% व्यक्ती (पुरुष व स्त्रिया) साक्षर असल्याचे आढळले.

मुलांमधील साक्षरतेचे प्रमाण पाहता एकूण मुलींपैकी ३७% मुली साक्षर असून ४०% मुले साक्षर आहेत. दोन्ही मिळून एकूण मुलामुलींपैकी ३९% साक्षर आहेत.

यावरून प्रौढ व्यक्तींमध्ये साक्षरतेचे प्रमाण खूपच कमी १०% आहे. परंतु मुलामुलीचे साक्षरतेचे प्रमाण ३९% आहे. यावरून प्रौढांपेक्षा २९% मुलामुलींचे साक्षरतेचे प्रमाण वाढलेले दिसून येते.




## शाळा



# १०. उदरनिर्वाहाची साधने (व्यवसाय)

मावळ तालुक्यातील कातकरींची उदरनिर्वाहाची साधने, त्यांचा मुख्य व्यवसाय, पुरक व्यवसाय त्याचा कालावधी त्यापासून मिळणारे मासिक व वार्षिक उत्पन्न यांची गावनिहाय माहिती संकलित करण्यात आली आहे.

**१०.१ कातकरी कुटुंबाचे व्यवसाय :--** पाहणी केलेली सर्व म्हणजे २२८ कातकरी कुटुंबे भूमीहीन आढळली. सर्व कुटुंबे कोकणातून उदरनिर्वाहासाठी मावळ तालुक्यात आलेली असून, गेली दोन ते तीन पिढ्यांपासून मावळ तालुक्यातील विविध गावांमध्ये राहत आहेत.

सदरील सर्व कुटुंबे ही अशिक्षित असून त्यांचेकडे कोणतेही तांत्रिक ज्ञान नसल्यामुळे शेतमजुरी, मोलमजुरी करणे, वीट भट्टीवर काम करणे, नदीतून ओढ्यातून वाळू काढणे, सुरक्षा रक्षक इत्यादी कष्टाचे व्यवसाय करताना आढळली. तसेच त्याबरोबर लाकुडफाटा गोळा करणे, मासेमारी, गौण वनोपज गोळा करणे, खेकडे पकडणे असे पुरक व्यवसाय करतात.

मावळ तालुक्यातील एकूण सर्वेक्षित २२८ कातकरी कुटुंबाचे मुख्य व दुय्यम व्यवसायानुसार वर्गीकरण खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशील | मुख्य व्यवसायाशी निगडीत कुटुंबे | | दुय्यम व्यवसायाशी पुरक निगडीत कुटुंबे | |
|---|---|---|---|---|---|
| | | कुटुंबाची संख्या | एकूण कुटुंबाशी टक्केवारी | कुटुंबाची संख्या | एकूण कुटुंबाशी टक्केवारी |
| १. | शेतमजूरी, इतर मजूरी | १३२ | ५८ | ४७ | २१ |
| २. | वीटभट्टीवर | २२ | १० | २३ | १० |
| ३. | नोकरी | ३१ | १३ | ० | – |
| ४. | इतर व्यवसाय | ४३ | १९ | १० | ४ |
| ५. | मासेमारी, खेकडे पकडणे | – | – | १२६ | ५५ |
| ६. | पुरक व्यवसाय करीत नसलेली | – | – | २२ | १० |
| | एकूण | २२८ | १०० | २२८ | १०० |


एकूण २२८ कातकरी कुटुंबापैकी १७५(७७%) कुटुंबे ही शेतमजुरी, रोजंदारी, मोलमजुरी व इतर व्यवसायाशी निगडीत आढळली. २२(१०%) कुटुंबे वीटभट्टीवर काम करताना आढळली व ३२(१३%) कुटुंबातील काही व्यक्ती खाजगी नोकरी करत असल्याचे आढळले.

एकूण २२८ कातकरी कुटुंबापैकी १९६ कुटुंबे दुय्यम व्यवसाय करताना आढळली. या १९६ कुटुंबापैकी ४७ कुटुंबे २३% शेतमजुरी /मोलमजुरी हा दुय्यम व्यवसाय करताना आढळली. २३ कुटुंबे (१२%) वीटभट्टीवर काम करतात. ३२ कुटुंबे दुय्यम व्यवसाय करीत नाहीत. यावरून ३२ कुटुंबे वर्षभर मुख्य व्यवसाय खाजगी नोकरी करतात.

## १०.२ मुख्य व्यवसाय

मोलमजुरी करणे, शेतमजुरी, वीटभट्टीवर विटा पाडणे तसेच इतर कामे हा कातकरी समाजाचा मुख्य व्यवसाय होय. मुख्य व्यवसाय साधारणपणे ६ ते ८ महिने चालतो तसेच मुख्य व्यवसायात पुरक व्यवसायापेक्षा रोजगार उपलब्ध होण्याचे प्रमाण व शक्यता जास्त असते.

वीटभट्टीवर काम करणारे कातकरी कुटुंब



**कालावधी.--** मुख्य व्यवसायाचा कालावधी हा वर्षात साधारणपणे ६ ते ८ महिने असतो. साधारण पावसाळ्यापासून ते हिवाळा संपेपर्यंत व उन्हाळ्यातील दोन महिने हा व्यवसाय करतात. हा व्यवसाय जरी ८ महिने चालू असला तरी शेतमालक किंवा रोजंदारी देणारा मालक हे सतत बदलले जातात. ज्या ठिकाणी रोजगार उपलब्ध होईल त्याकडे त्यांना जावे लागते. त्यामुळे बऱ्याच वेळा मालकाकडून पूर्ण रोजंदारी दिली जात नाही. रोजंदारी बुडविणेचे प्रकार सतत घडत असतात.

या कालावधीत रोजंदारी उपलब्ध नसल्यास मासे पकडणे, खेकडे पकडणे हाही व्यवसाय केला जातो.

**नोकरी .--** पवना धरणाचे पाणलोट क्षेत्राचे सर्व बाजूस डोंगर दऱ्यांमध्ये कातकरी राहतात. लोणावळ्याजवळ बहुतांशी जमीन ही धनाढ्य लोकांनी घेतलेली असून त्यांनी त्या ठिकाणी विविध नर्सरी सुरु केल्या आहेत. या नर्सरीच्या लगतच्या डोंगर गावातील कातकरी तरुण सदर नर्सरीसाठी कमी रोजंदारीवर उपलब्ध होतात. तसेच कातकरी हे प्रामाणिक असल्याने त्याचाही फायदा मालकांना होतो. नर्सरीमध्ये रोपांची बांधणी, मातीच्या पिशव्या भरणे, रोपांना पाणी देणे, रोपांची छाटणी फुलांची निवड करून व्यवस्थित पॅकिंग करणे अशा स्वरूपाची कामे या आदिवासी तरुण वर्गाकडून करून घेतली जातात.

नर्सरीमध्ये काही प्रमाणात शाश्वत नोकरी तसेच ३ ते ५ हजार मासिक पगार दिला जातो असे आढळले. काही नर्सरीमध्ये आदिवासी तरुण सुरक्षारक्षक म्हणून काम करताना आढळले.

**उत्पन्न.--** मुख्य व्यवसायापासून मिळणारे सरासरी मासिक उत्पन्न हे पुरक व्यवसायापासून मिळणाऱ्या मासिक उत्पन्नापेक्षा दीडपटीने जास्त आढळले. यावरुन पुरक व्यवसायाच्या कमी उत्पन्नामुळे कातकरींचे सरासरी मासिक उत्पन्न कमी झालेले दिसून येते.

**मुख्य व्यवसायाशी संबंधित माहिती खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.**

| अ.क्र. | बाब | | तपशील |
|---|---|---|---|
| १ | प्रमुख व्यवसायाचा प्रकाराशी निगडीत कुटुंबे<br>अ) शेतमजुरी /मोलमजुरी<br>ब) इतर | <br>२०४<br>२४ | २२८ |
| | **एकूण** | २२८ | २२८ |
| २ | प्रमुख व्यवसायाशी निगडीत असलेल्या व्यक्ती | | ५८३ |
| ३ | प्रमुख व्यवसायाचा सरासरी कालावधी | | ६ ते ८ महिने |
| ४ | प्रमुख व्यवसायापासून मिळालेले अंदाजे एकूण उत्पन्न | | रु. ५०,४१,२००/- |
| ५ | प्रमुख व्यवसायाशी निगडीत असलेल्या व्यक्तीचे सरासरी मासिक उत्पन्न | | रु. १०९१/- |
| ६ | कुटुंबाचे प्रमुख व्यवसायापासूनचे सरासरी मासिक उत्पन्न | | रु.२७६३/- |
| ७ | प्रमुख व्यवसायाशी निगडीत प्रत्येक कुटुंबातील सरासरी व्यक्ती | | २.५५ |



वि (वाय) ५७१— ३-अ

## मावळ तालुक्यातील कातकरी कुटुंबांचे सर्वेक्षण

### मुख्य व्यवसायासाठी निगडीत असलेल्या व्यक्ती, व्यवसायाचा कालावधी व उत्पन्न

| अ. क्र. | गावाचे नाव | कुटुंबांची संख्या | प्रमुख व्यवसाय कुटुंबे | | | मुख्य व्यवसायाशी निगडीत व्यक्ती | प्रमुख व्यसाय कालावधी (महिने) | कालावधीतील मासिक उत्पन्न | एकूण उत्पन्न रु. | व्यवसायाशी निगडीत व्यक्तीचे सरासरी मासिक उत्पन्न | कुटूबांचे सरासरी मासिक उत्पन्न रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मोलमजुरी | इतर | एकूण | | | | | | |
| १ | राऊतवाडी | ३० | २६ | ४ | ३० | ८२ | १८३ (६) | ८३९५० | ४९०८०० | १०२३ | २७२६ |
| २ | खडकवाडी | २४ | २४ | ० | २४ | ६२ | १३४(६) | ५९६०० | ३१६२०० | ९६१ | २१९५ |
| ३ | पवनानगर | ४ | २ | २ | ४ | १० | २४ (७) | १९००० | ११४००० | १९०० | ४०७१ |
| ४ | टाकूरसाई | २ | २ | ० | २ | ७ | १२ (६) | ७००० | ४२००० | १००० | ३५०० |
| ५ | कोथुर्णी | ७ | ५ | २ | ७ | २० | ५० (७) | २०९०० | १४७२०० | १०४५ | ३५०४ |
| ६ | महागाव | ७ | ५ | २ | ७ | १८ | ८२ (९) | २५३५० | १८१८०० | १४०८ | २८८५ |
| ७ | मलवडी | ४ | ४ | ० | ४ | ८ | २७ (७) | ९००० | ६०५०० | ११२५ | २२६० |
| ८ | वारु | ४ | ४ | ० | ४ | १५ | ३० (७) | १४९०० | ९३००० | ९९३ | ३३२१ |
| ९ | आंबेगाव | २४ | २४ | ० | २४ | ५६ | २०२ (८) | ६८८०० | ५५६५०० | १२२८ | ३६३७ |
| १० | आपटी | ४ | ४ | ० | ४ | १२ | ३३ (८) | १३६०० | ११६४०० | ११३३ | ३६३७ |
| ११ | शिळींब | २८ | २४ | ४ | २८ | ६८ | २६४ (९) | ७११०० | ६६९८०० | १०४५ | २६५७ |
| १२ | जवन | १८ | १६ | २ | १८ | ४८ | १८७ (१०) | ४५४०० | ३९२८०० | ९४५ | २१८२ |
| १३ | कोटमवाडी | ३८ | ३० | ८ | ३८ | १०१ | ३४२ (९) | १२७३०० | ११६६२०० | १२६० | ३४०९ |
| १४ | कोळेचाफेसर | ३४ | ३४ | ० | ३४ | ७६ | ३०८ (९) | ७०७०० | ६९४००० | ९३० | २०४१ |
| | एकूण | २२८ | २०४ | २४ | २२८ | ५८३ | १८७८(८) | ६३६६०० | ५०४१२०० | १०९१ | २७६३ |

एकूण कुटुंबांपैकी ८९% कुटुंबे शेतमजुरी, मोलमजुरी करतात व ११% कुटुंबे सुरक्षारक्षक, विटभट्टीवर काम करणे, वाळू काढणे इत्यादी कामे करतात.

एकूण २२८ कुटुंबातील ७८३ व्यक्ती मुख्य व्यवसायाशी संबंधित आहेत. यावरुन प्रत्येक कुटुंबातील सरासरी २.५५ व्यक्ती मुख्य व्यवसायाशी निगडित आहेत.

वर्षातून प्रमुख व्यवसायाचा कालावधी साधारणपणे सरासरी ६ ते ८ महिने असल्याचे आढळले. प्रत्येक कुटुंबांचे प्रमुख व्यवसायाचे सरासरी मासिक उत्पन्न २७६३ रुपये एवढे आढळले.

## १०.३ दुय्यम व्यवसाय (पूरक व्यवसाय)


मुख्य व्यवसायातील कालावधी सोडून इतर कालावधीत उदरनिर्वाहाचे साधन म्हणून काही कातकरी पूरक / दुय्यम व्यवसाय करताना आढळले. दुय्यम व्यवसायामध्ये किरकोळ मोलमजुरी, लाकुडफाटा गोळा करून विकणे, ओढा, नदीतील वाळू उपसणे, वनौपज गोळा करून विकणे, मासेमारी, खेकडे पकडणे असे व्यवसाय करताना आढळले.

कातकरी वर्षातील सरासरी ४ ते ६ महिने पूरक व्यवसाय करतात. बऱ्याच वेळा मुख्य व्यवसायासोबत दुय्यम व्यवसायही केला जातो.

**कातकरी स्त्रिया मासे पकडताना**



**कातकरी पुरुष मासे पकडत असताना**



दुय्यम व्यवसायाशी संबंधित माहिती खालीलप्रमाणे तक्त्यात दर्शविलेली आहे :

| अ.क्र. | बाब | | तपशील |
|---|---|---|---|
| १ | दुय्यम व्यवसायाशी निगडित कुटुंबे | | २०६ |
| | (अ) शेतमजुरी /मोलमजुरी | ७० | |
| | (ब) इतर | १३६ | |
| | एकूण | २०६ | |
| २ | दुय्यम व्यवसायाशी निगडित असलेल्या व्यक्ती | | ३४५ |
| ३ | दुय्यम व्यवसायाचा सरासरी कालावधी | | ५.२९ महिने |
| ४ | दुय्यम व्यवसायापासून मिळालेले अंदाजे एकूण उत्पन्न | | रु.७,८९,२००/- |
| ५ | कुटुंबाचे दुय्यम व्यवसायापासूनचे सरासरी मासिक उत्पन्न | | रु.७५३/- |
| ६ | दुय्यम व्यवसायाशी निगडित प्रत्येक कुटुंबातील सरासरी व्यक्ती | | १.७४ |

पाहणी केलेल्या २२८ कातकरी कुटुंबापैकी २०६ कुटुंबे ८६% दुय्यम व्यवसायाशी निगडित आहेत.

दुय्यम व्यवसाय करणाऱ्या २०६ कुटुंबांपैकी ४७ (२४%) कुटुंबे शेतमजुरी, मोलमजुरी करतात व उर्वरित ७६% कुटुंबे मासेमारी, खेकडे पकडणे, लाकुडफाटा गोळा करणे, तसेच वनौपज गोळा करणे, हे व्यवसाय करतात.

२०६ कुटुंबातील ३४५ व्यक्ती ह्या दुय्यम व्यवसायाशी निगडित आहेत. यावरुन प्रत्येक कुटुंबातील सरासरी १.७४ व्यक्ती ह्या व्यवसायाशी निगडित आहेत. दुय्यम व्यवसायाचा सरासरी कालावधी ५.२९ महिने इतका आढळला.

दुय्यम व्यवसाय करणाऱ्या २०६ कुटुंबांतील प्रत्येक कुटुंबाचे दुय्यम व्यवसायापासूनचे सरासरी मासिक उत्पन्न रु. ७५३ इतके आढळले.

# मावळ तालुक्यातील कातकरी कुटुंबांचे सर्वेक्षण

## दुय्यम व्यवसायासाठी निगडित असलेल्या व्यक्ती, व्यवसायाचा कालावधी व उत्पन्न

| अ. क्र. | गावाचे नाव | कुटुंबांची संख्या | दुय्यम व्यवसाय कुटुंबे | | | | निगडित व्यक्ती | निगडित व्यक्तीचे एकूण मासिक उत्पन्न | निगडित व्यक्तीचे दुय्यम व्यवसायाच्या कालावधीचे एकूण उत्पन्न | कुटुंबांचे सरासरी मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मोलमजुरी | इतर | मासे मारी | एकूण | | | | |
| १ | राऊतवाडी | ३० | ८ | ६ | १९ | ३३ | ८२ | ४२००० | १७९४०० | ११९६ |
| २ | खडकवाडी | २४ | ३ | ६ | १५ | २४ | ६२ | २६१५० | ११८६०० | १००६ |
| ३ | पवनानगर | ४ | ० | ० | ३ | ३ | १० | १२०० | १७६०० | १७६१ |
| ४ | ठाकूरसाई | २ | ० | ० | २ | २ | ७ | ११०० | १०२०० | २५५० |
| ५ | कोथुर्णी | ७ | १ | १ | ४ | ६ | २० | ४८०० | १२००० | ८०० |
| ६ | महागाव | ७ | ० | ० | ३ | ३ | ६ | २१०० | ६२०० | ७७६ |
| ७ | मलवडी | ४ | २ | ० | २ | ४ | ४ | ४१०० | १४४०० | १०२८ |
| ८ | वारु | ४ | २ | ० | २ | ४ | १२ | २४०० | १२४०० | १०३३ |
| ९ | आंबेगाव | २४ | ० | ४ | १० | १४ | ३४ | १५८०० | ३८६०० | ९४५ |
| १० | आपटी | ४ | ० | ० | २ | २ | २ | १५०० | ६००० | ७५० |
| ११ | शिळींब | २८ | १० | ० | १८ | २८ | २८ | ३६९०० | १०४००० | १३९१ |
| १२ | जवन | १८ | ६ | २ | १२ | २० | १८ | २६३०० | ११८२०० | १३४५ |
| १३ | कोटमवाडी | ३८ | ४ | ८ | १५ | २७ | २६ | ३१००० | ६६००० | ९०६ |
| १४ | कोळेचाफेसर | ३४ | १० | ६ | १९ | ३५ | ३४ | ४३३०० | ८५६०० | १२५८ |
| | एकूण | २२८ | ४७ | ३३ | १२६ | २०६ | ३४५ | २३८६५० | ७८९२०० | ७५३ |

## पाहणी केलेल्या कातकरी कुटुंबांचे सरासरी उत्पन्न

कातकरी कुटुंबांचे मुख्य व्यवसाय, दुय्यम व्यवसाय यापासून मिळणारे एकूण उत्पन्न, कुटुंबाचे सरासरी वार्षिक, मासिक व दैनिक उत्पन्नाची आकडेवारी खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.

(उत्पन्न रुपयांमध्ये)

| अ. क्र. | गावाचे नाव | कुटुंबांची संख्या | मुख्य व्यवसायापासून मिळणारे उत्पन्न | दुय्यम व्यवसायापासून मिळणारे उत्पन्न | सर्व कुटुंबांचे सरासरी एकूण उत्पन्न | कुटुंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्न | कुटुंवाचे सरासरी मासिक उत्पन्न | कुटुंबाचे सरासरी दैनिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राऊतवाडी | ३० | ४,९०,८०० | १७९४०० | ६७०२०० | २२३४० | १८६१ | ६१.२० |
| २ | खडकवाडी | २४ | ३,१६,२०० | ११८६०० | ४३४८०० | १८११६ | १५१० | ४९.६३ |
| ३ | पवनानगर | ४ | १,१४,००० | २३४७०* | १३७४७० | ३४३६७ | २९९० | ९४.१६ |
| ४ | ठाकूरसाई | २ | ४२,००० | १०२०० | ५२२०० | २६१०० | २१७५ | ७१.५० |
| ५ | कोथुर्णी | ७ | १,४७,२०० | १४०००* | १६१२०० | २३०२८ | १९१९ | ६३.०९ |
| ६ | महागाव | ७ | १,८१,८०० | १४४७० * | १९६२७० | २८०३८ | २३३६ | ७६.८१ |
| ७ | मलवडी | ४ | ६०,५०० | १४४०० | ७४९०० | १८७२५ | १५६० | ५१.३० |
| ८ | वारु | ४ | ९३,००० | १२४०० | १०५४०० | २६३५० | २१९६ | ७२.१९ |
| ९ | आंबेगाव | २४ | ५,५६,५०० | ६६१७०* | ६२२६७० | २५९४४ | २१६२ | ७१.०८ |
| १० | आपटी | ४ | १,१६,४०० | १२०००* | १२८४०० | ३२१०० | २६७५ | ८७.९४ |
| ११ | शिळींब | २८ | ६,६९,८०० | १०४००० | ७७३८०० | २७६३५ | २३०३ | ७५.७१ |
| १२ | जवन | १८ | ३,९२,८०० | ११८२०० | ५११००० | २८३८८ | २३६६ | ७७.७७ |
| १३ | कोटमवाडी | ३८ | ११,६६,२०० | ९६४६०* | १२६२६६० | ३३२२८ | २७६९ | ९१.०३ |
| १४ | कोळेचाफेसर | ३४ | ६,९४,००० | ८५६०० | ७७९६०० | २२९२९ | १९१० | ६२.८१ |
| | एकूण | २२८ | ५०४१२०० | ८६९३७० | ५९१०५७० | २५९२३ | २१६० | ७१.०० |

* सदरील ६ गावातील सर्वेक्षित ८४ कुटुंबापैकी दर्शविलेली फक्त ५२ कुटुंबे पूरक व्यवसायाशी संलग्न होती उर्वरित २२ कुटुंबे पूरक व्यवसाय करीत नव्हती. परंतु सरासरी वार्षिक उत्पन्न काढण्यासाठी ६२ कुटुंबांच्या उत्पन्नावरून ८४ कुटुंबांचे उत्पन्न काढण्यात आले आहे.

## ११. कातकरी कुटुंबाचे उत्पन्न

**११.१ कातकरी कुटुंबांचे वार्षिक, मासिक व दैनिक उत्पन्न :--** पाहणी केलेल्या २२८ कुटुंबांचे मुख्य व्यवसाय व पूरक व्यवसायापासूनचे उत्पन्नाच्या आकडेवारीवरुन सरासरी वार्षिक उत्पन्न काढण्यात आले आहे. एकूण २२८ कुटुंबांचे मुख्य, दुय्यम व्यवसायापासूनचे एकूण उत्पन्न तसेच वार्षिक उत्पन्न याची आकडेवारी खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.

| अ. क्र. | तपशील | रुपये |
|---|---|---|
| १ | कुटुंबांचे मुख्य व्यवसायापासून मिळणारे सरासरी वार्षिक उत्पन्न | २२११० |
| २ | कुटुंबांचे पूरक व्यवसायापासून मिळणारे सरासरी वार्षिक उत्पन्न | ३८१३ |
| ३ | प्रत्येक कुटुंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्न | २५९२३ |
| ४ | प्रत्येक कुटुंबाचे सरासरी मासिक उत्पन्न | २१६० |
| ५ | प्रत्येक कुटुंबाचे सरासरी दैनिक उत्पन्न | ७१.०० |

२२८ कुटुंबांच्या मुख्य व्यवसाय व दुय्यम व्यवसायापासून मिळणाऱ्या उत्पन्नाच्या आकडेवारीवरुन वार्षिक उत्पन्न काढण्यात आले असून प्रत्येक कुटुंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्न रु. २५९२३/- व सरासरी मासिक उत्पन्न रु. २१६०/- इतके आढळले. तसेच प्रत्येक कुटुंबाचे सरासरी दैनिक उत्पन्न फक्त रु. ७१.०० इतके आढळले आहे.


**कातकरी कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे सरासरी वार्षिक, मासिक व दैनिक उत्पन्न :--** पाहणी केलेल्या २२८ कातकरी कुटुंबांमध्ये ११५६ व्यक्ती आढळल्या. यावरुन प्रत्येक कुटुंबात सरासरी ५ व्यक्ती असल्याचे दिसते. त्यानुसार प्रत्येक व्यक्तीचे कुटुंबनिहाय उत्पन्न, कुटुंबांतील व्यक्तीनिहाय उत्पन्न यांची माहिती खालील तक्त्यात दर्शविलेली आहे.


| अ. क्र. | तपशील | रुपये |
|---|---|---|
| १ | कुटुंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्न | २५९२३ |
| २ | कुटुंबातील सरासरी व्यक्तींची संख्या | ५ |
| ३ | कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे सरासरी वार्षिक उत्पन्न | ५१८६ |
| ४ | कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे सरासरी मासिक उत्पन्न | ४३२ |
| ५ | कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे सरासरी दैनिक उत्पन्न | १४.०० |

**११.२ कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे सरासरी दैनिक उत्पन्न :--** पाहणी केलेल्या २२८ कातकरी कुटुंबांचे सरासरी दैनिक उत्पन्न रुपये १४.०० इतके आढळले. या तोकड्या उत्पन्नातील काही रक्कम ही नियमित दारु पिण्यात जाते. उर्वरित रकमेत कातकरी आपल्या कुटुंबाच्या अन्न, वस्त्र व निवारा या किमान गरजासुध्दा भागवू शकत नाही, हे त्रिवार सत्य आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | कुटुंबाचे सरासरी दैनिक उत्पन्न (रुपयात) | कुटुंबातील सरासरी व्यक्ती | प्रत्येक व्यक्तीचे दैनिक उत्पन्न (रुपयात) |
|---|---|---|---|---|
| १ | राऊतवाडी | ६१.२० | ५.७ | १०.७४ |
| २ | खडकवाडी | ४९.६३ | ५.२ | ९.६१ |
| ३ | पवनानगर | ९४.१६ | ५.५ | १७.१२ |

| अ.क्र. | गावाचे नाव | कुटुंबाचे सरासरी दैनिक उत्पन्न (रुपयात) | कुटुंबातील सरासरी व्यक्ती | प्रत्येक व्यक्तीचे दैनिक उत्पन्न (रुपयात) |
|---|---|---|---|---|
| ४ | ठाकूरसाई | ७१.५० | ७.५ | ९.५३ |
| ५ | कोथुर्णी | ६३.०९ | ५.९ | १०.७७ |
| ६ | महागाव | ७६.८१ | ४.९ | १५.८२ |
| ७ | मलवडी | ५१.३० | ५.० | १०.२६ |
| ८ | वारु | ७२.१९ | ६.३ | ११.५५ |
| ९ | आंबेगाव | ७१.०८ | ४.८ | १४.९६ |
| १० | आपटी | ८७.९४ | ५.० | १७.५९ |
| ११ | शिळींब | ७५.७१ | ५.० | १५.०४ |
| १२ | जवन | ७७.७७ | ५.१ | १५.२२ |
| १३ | कोटमवाडी | ९१.०३ | ४.९ | १८.६० |
| १४ | कोळेचाफेसर | ६२.८१ | ४.४ | १४.१४ |
| | एकूण | ७१.०० | ५.१ | १४.०० |






**११.३ वार्षिक उत्पन्ननिहाय कुटुंबाची वर्गवारी :--** पाहणी केलेल्या २२८ कुटुंबांची वार्षिक उत्पन्नाची माहिती संकलित केली. सदरील वार्षिक उत्पन्नाची आकडेवारी खालील तक्यात दर्शविलेली आहे -

| अ. क्र. | गावाचे नाव | एकूण कुटुंबे | वार्षिक उत्पन्न (रुपयात) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०,००० पर्यंत | २०,००१ ते ३०,००० पर्यंत | ३०००१ ते ४०,००० पर्यंत | ४०,००१ ते ५०,००० पर्यंत | ५०,००१ चे वर |
| १ | करुंज | ३० | १५ | ११ | ४ | ० | ० |
| २ | शिवली | २४ | २० | ४ | ० | ० | १ |
| ३ | पवनानगर | ४ | २ | १ | ० | ० | ० |
| ४ | ठाकुरसाई | २ | १ | ० | १ | ० | ० |
| ५ | कोर्थुणे | ७ | ५ | ० | २ | ० | २ |
| ६ | महागाव | ७ | १ | ३ | १ | ० | ० |
| ७ | मलवडी | ४ | १ | ३ | ० | ० | ० |
| ८ | वारु | ४ | १ | १ | ० | २ | ० |
| ९ | आंबेगाव | २४ | ८ | ८ | ७ | १ | ० |
| १० | आपटी | ४ | १ | १ | ० | २ | ० |
| ११ | शिळींब | २८ | ११ | १० | ५ | १ | १ |
| १२ | जवन | १८ | १२ | ३ | २ | १ | ० |
| १३ | कोटमवाडी | ३८ | १६ | ६ | ५ | २ | ९ |
| १४ | कोळेचाफेसर | ३४ | १९ | ५ | ३ | ४ | ३ |
| | **एकूण** | २२८ | ११३ | ५६ | ३० | १३ | १६ |

पाहणी केलेल्या या कुटुंबांपैकी १६९(७४%) कुटुंबे ० ते ३० हजार या उत्पन्न गटात येतात. यावरुन सर्वात जास्त कुटुंबे ही अत्यंत कमी उत्पन्न असणाऱ्या वर्गात दिसतात.

पाहणी केलेल्या २२८ कुटुंबांपैकी ७४% कुटुंबे ० ते ३०,००० या उत्पन्न गटात मोडतात. तसेच १३% कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ३१,००० ते ४०,००० यामध्ये मर्यादित आहे.

शिवली गावातील सर्व कुटुंबे (१००%) रु. ० ते ३०,००० या उत्पन्न गटात असून कोळेचाफेसर येथील ५०% कुटुंबे रु. ० ते ३०,००० या उत्पन्न गटात मोडतात.

कोटमवाडी, चावसर कोळेचाफेसर या गावातील काही कुटुंबातील व्यक्ती पठारावरील नर्सरीमध्ये नोकरी तसेच मजुरीवर काम करतात. इतर मजुरीच्या तुलनेत या ठिकाणी मजुरी व पगार जास्त मिळतो. त्यामुळे वरील गावातील १२ कुटुंबाचे उत्पन्न रु. ४०,००० ते ५०,००० चे दरम्यान आढळते.


महागाव या गावातील फक्त एका कुटुंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्न रु. २०,००० चे आत आढळले. तीन कुटुंबाचे उत्पन्न रु. २०,००१ ते ३०,००० च्या दरम्यान आहे. एका कुटुंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्न रु. ३०,००१ ते ४०,००० च्या दरम्यान आहे व एका कुटुंबाचे सरासरी वार्षिक उत्पन्न रु.५०,००१ च्या वर आहे.



वि (वाय) ५७१—४

## १२. पशुधन

पाहणी केलेली कुटुंबे भूमिहीन असून अशाश्वत रोजगार, अनियमित उत्पन्न, आर्थिक टंचाई, असुरक्षितता तसेच चा-याच्या उपलब्धतेसाठी येणाऱ्या अडचणींमुळे अशा विविध कारणांमुळै कातकरींकडे पशुधन फारच कमी प्रमाणात आढळते. त्या प्रमाणात कातकरींकडे शेळ्या, मेंढ्या व कोंबड्या जास्त प्रमाणात असल्याचे दिसून आले आहे.



मावळ तालुक्यातील पाहणी केलेल्या २२८ कातकरी कुटुंबापैकी पशुधन, शेळ्या व कुकुट असणाऱ्या कुटुंबांची गावनिहाय आकडेवारी माहिती सोबतच्या तक्यात दिली आहे.


१२.१--मावळ तालुक्यातील पाहणी केलेल्या २२८ कातकरी कुटुंबात असलेल्या पशुधनाची माहिती खालीलप्रमाणे आहे -

| अ. क्र. | गाव | कुटुंबांची संख्या | उपलब्ध पशुधन | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | बैल | | | गाई | | | शेळ्या | | | कोंबड्या | | |
| | | | कुटुंबे | संख्या | किंमत | कुटुंबे | संख्या | किंमत | कुटुंबे | संख्या | किंमत | कुटुंबे | संख्या | किंमत |
| १ | करुंज | ३० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | १२ | ९००० | ४ | १९ | १३०० |
| २ | शिवली | २४ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ५ | ४१०० | ० | ० | ० |
| ३ | पवनानगर | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | ठाकुरसाई | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | कोर्थुणे | ७ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २० | २०००० | ० | ० | ० |
| ६ | महागाव | ७ | ० | ० | ० | १ | १ | ५००० | २ | २ | २००० | १ | १५ | २००० |
| ७ | मलवडी | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | वारु | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ९ | आंबेगाव | २४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ४ | ३०० |
| १० | आपटी | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३० | ३००० |
| ११ | शिळींब | २८ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १० | १००० |
| १२ | जवन | १८ | ० | ० | ० | १ | १ | ३००० | १ | ५ | ५००० | ० | ० | ० |
| १३ | कोटमवाडी | ३८ | १ | २ | १२००० | ० | ० | ० | ८ | २३ | ३२००० | ११ | ४९ | ४६०० |
| १४ | कोळेचाफेसर | ३४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | १०० |
| | एकूण ... | २२८ | १ | २ | २३१ | २ | २ | ८००० | १६ | ६७ | ७२१०० | २० | १२९ | १२३०० |

पाहणी केलेल्या २२८ कातकरी कुटुंबापैकी फक्त एका कुटुंबाकडे २ बैल आढळले. तसेच दोन कुटुंबांकडे २ गाई आढळल्या. सोळा कुटुंबांकडे ६७ शेळया आढळल्या व वीस कुटुंबांकडे १२९ कोंबडया आढळल्या आहेत.

स्वत: भूमिहीन तसेच व्यवसनाधीन त्यामुळे पशुधन पाळणे त्याचे खाद्य, पाणी, निगराणी या गोष्टी करणे अवघड असल्याने कातकरी कुटुंबांचा पशुधनाकडे ओढा दिसत नाही.

### पाहणी केलेल्या कातकरी कुटुंबांकडील पशुधन



## १३. औषधोपचार पध्दती

कातकरी जमातीचे वास्तव्य गावापासून दूर डोंगराच्या पायथ्याशी असते. संकोची स्वभाव, अज्ञान, अपुरे वस्त्र, दारिद्र्य, अनिश्चित रोजगार, अस्वच्छता त्यामुळे हा समाज मूळ प्रवाहापासून दूर लोटला गेलेला आहे. कातकरी हे डोंगर माथ्यावर किंवा पायथ्यावर राहत असल्याने दळणवळणाच्या अपुऱ्या सुविधांमुळे कुटुंबातील व्यक्ती आजारी पडल्यास ते दवाखान्यात नेऊ शकत नाही. प्रत्यक्षात बहुतांशी कातकरी कुटुंबे पारंपरिक वनौषधांचा वापर करतात. तसेच घरगुती उपचार करतात, कातकरी जमातीवर अज्ञानामुळे भगत, देवऋषी, वैदूंचा पगडा आढळतो. बहुतांशी कातकरी यांचेवर अवलंबून राहतात. दवाखान्यापेक्षा वैदू, भगत, देवऋषी यांच्यावर कातकरींचा जास्त विश्वास असतो.

पाहणी केलेल्या २२८ कुटुंबापैकी २०८ कुटुंबे वैदूची औषधे वापरतात. १३४ कुटुंबे घरगुती उपचार करतात. १७२ कुटुंबे आजही भगताचा आधार घेतात. तसेच १४२ (६२%) कुटुंबे सरकारी / खाजगी दवाखान्यात जातात.

### १३.१ विविध औषधोपचार स्वीकारणाऱ्या कुटुंबांची माहिती :

| अ. क्र. | गाव | कुटुंबांची संख्या | उपचार पध्दती (कुटुंबे) | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पारंपरिक वनौषधी | घरगुती उपचार | भगत | दवाखाना |
| १ | करुंज | ३० | १९ | १७ | २० | २५ |
| २ | शिवली | २४ | २३ | २ | १५ | १९ |
| ३ | पवनानगर | ४ | २ | २ | २ | २ |
| ४ | ठाकुरसाई | २ | २ | २ | २ | २ |
| ५ | कोर्थुणे | ७ | ७ | ६ | ७ | ५ |
| ६ | महागाव | ७ | ७ | ५ | ७ | ५ |
| ७ | मलवडी | ४ | ४ | ४ | ४ | २ |
| ८ | वारु | ४ | ४ | ४ | २ | २ |
| ९ | आंबेगाव | २४ | २२ | १५ | १५ | १७ |
| १० | आपटी | ४ | ४ | ४ | ३ | ४ |
| ११ | शिळींब | २८ | २५ | १० | १६ | १९ |
| १२ | जवन | १८ | १७ | १० | १७ | १० |
| १३ | कोटमवाडी | ३८ | ३८ | २९ | ३० | २३ |
| १४ | कोळेचाफेसर | ३४ | ३४ | २४ | ३२ | २७ |
| | एकूण ... | २२८ | २०८ | १३४ | १७२ | १६२ |


औषधोपचारासाठी पारंपरिक वनौषधी व भगताचा वापर कातकरी कुटुंबांकडून मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे वरील तक्त्यावरुन आढळते.

१३.२. विविध कारणांसाठी दवाखान्यात जाणारी कुटुंबे :

| अ. क्र. | गावाचे नाव | सर्वेक्षित कुटुंबे | दवाखान्यात विविध कारणांसाठी जाणाऱ्या कुटुंबांची संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आजारपणावर उपचार | लसीकरण | बाळंतपणापूर्वीची तपासणी | बाळंतपणा-साठी | कुटुंब नियोजन | आरोग्या-साठी |
| १ | राऊतवाडी | ३० | २५ | १० | २ | २ | ० | ० |
| २ | खडकवाडी | २४ | २० | ८ | ० | ० | ० | ० |
| ३ | पवनानगर | ४ | ४ | २ | २ | १ | ० | ० |
| ४ | ठाकूरसाई | २ | २ | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | कोथुर्णी | ७ | ६ | ५ | ० | ० | ० | ० |
| ६ | महागाव | ७ | ५ | २ | ० | ० | ० | ० |
| ७ | मलवडी | ४ | ३ | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | वारु | ४ | ४ | ० | ० | ० | ० | ० |
| ९ | आंबेगाव | २४ | २० | १० | ३ | २ | ० | ० |
| १० | आपटी | ४ | ४ | ४ | ० | ० | ० | ० |
| ११ | शिळींब | २८ | १२ | १० | ० | ० | ० | ० |
| १२ | जवन | १८ | ९ | ८ | ० | ० | ० | ० |
| १३ | कोटमवाडी | ३८ | १२ | १० | ० | ० | ० | ० |
| १४ | कोळेचाफेसर | ३४ | १० | १५ | ० | ० | ० | ० |
| | एकूण ... | २२८ | १३६ | ८४ | ७ | ५ | ० | ० |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, एकूण २२८ कुटुंबांपैकी आजारपणावर उपचार करण्यासाठी एकूण १३६ (६०%) कुटुंबे दवाखान्यात जातात. लसीकरणासाठी ८४ (३७%) कुटुंबे दवाखान्यात जातात. बाळंतपणाच्या सल्ल्यासाठी फक्त ७ (२%) कुटुंबे दवाखान्यात जातात.

दवाखान्यात विविध कारणांसाठी जाणाऱ्या कुटुंबांची संख्या



१३.३.   पाहणी केलेल्या कातकरी कुटुंबाची औषधोपचाराच्या पध्दतीनुसार वर्गवारी :--

| अ. क्र. | औषधोपचार पध्दती | पाहणी केलेली कातकरी कुटुंबे | फायदा घेणारी कुटुंबे | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | पारंपारिक वनौषधी | २२८ | २०७ | ९१% |
| २ | घरगुती उपचार | २२८ | २१५ | ९४% |
| ३ | भगत, देवऋषी (ओझा) | २२८ | १९० | ८३% |
| ४ | दवाखाना | २२८ | १६६ | ७३% |

एकूण कुटुंबांपैकी ९१% कुटुंबे पारंपारिक वनौषधींचा वापर करतात. ९४% कुटुंबे घरगुती उपचार करतात.

पाहणी केलेल्या १४ गावातील कातकरी कुटुंबाची औषधोपचाराच्या पध्दती पाहता जी गावे शहरापासून जवळ आहेत तसेच मुख्य रस्त्यालगतची गावे, ज्या गावात दवाखाना आहे अशा ठिकाणी कातकरी कुटुंबे दवाखान्यात जातात. हे खालील तक्त्यावरुन दिसते.

| प्रकार | गावाचे नाव | पाहणी केलेली कुटुंबे | यापैकी दवाखान्यात जाणारी कुटुंबे | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| शहराजवळची गावे व मुख्य रस्त्यालगतची गावे, गावात दवाखाना असलेली गावे | राऊतवाडी | ३० | २५ | ७४% |
| | खडकवाडी | २४ | २० | ८३% |
| | पवनानगर | ४ | ४ | १००% |
| | ठाकूरसाई | २ | २ | १००% |
| | कोथुर्णी | ७ | ६ | ८६% |
| | महागाव | ७ | ६ | ८६% |
| | मलवडी | ४ | ३ | ७५% |
| | वारु | ४ | ४ | १००% |
| | आंबेगाव | २४ | २० | ८३% |
| | आपटी | ४ | ४ | १००% |
| डोंगर पायथ्यालगतची व दळणवळणाची सोय नसलेली गावे | शिळींब | २८ | ११ | ३९% |
| | जवन | १८ | ९ | ५०% |
| | कोटमवाडी | ३८ | १२ | ३१% |
| | काळेचाफेसर | ३४ | १० | २९% |
| | एकूण ... | २२८ | १३६ | ६०% |

वरील तक्त्यावरुन एकूण १४ गावांपैकी १० गावे ही मुख्य रस्त्यावर आहेत व दळणवळण सुविधा असल्याने या १० गावातील ११० कुटुंबापैकी ९४ (८६%) कुटुंबे दवाखान्यात जातात. परंतू उर्वरीत ४ गावे ही डोंगर पायथ्यालगत असून दळणवळण सुविधा कमी प्रमाणात उपलब्ध असल्याने एकूण ११८ कातकरी कुटुंबांपैकी फक्त ४२ कुटुंबे (३५%) दवाखान्यात जातात.

डोंगर पायथ्यास असणाऱ्या गावांना मोफत औषधोपचार गावामध्ये प्राप्त होण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. सदरील गावांमध्ये जवळच्या गावांतील परिचारिका भेट देत असतात. परंतु त्याचे भेटीत सातत्यता नसते. असे कातकरी कुटुंबाकडून समजले.

## १४. कातकरी कुटुंबांकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे

मावळ तालुक्यातील २२८ कातकरी कुटुंबांकडे विविध अत्यावश्यक कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचे फायदे मिळत नसल्याचे पाहणीत आढळले.

वरील कुटुंबाकडे कोणती कागदपत्रे उपलब्ध आहेत याची माहिती संकलीत केली ती खालीलप्रमाणे आहे -


| अ. क्र. | कागदपत्रांचा तपशील | कुटुंबांची संख्या | एकूण कुटुंबांशी टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | फक्त रेशनकार्ड उपलब्ध असलेली कुटुंबे | १५ | ७ % |
| २ | फक्त निवडणूक कार्ड असलेली कुटुंबे | ४८ | २१ % |
| ३ | रेशनकार्ड व निवडणूक कार्ड दोन्हीही असलेली कुटुंबे | ६० | २६ % |
| ४ | रेशन कार्ड, निवडणूक कार्ड व दारिद्रय रेषेखालील दाखला असलेली कुटुंबे | १० | ४ % |
| ५ | कोणत्याही प्रकारचे कागदपत्र (दाखले) नसलेली कुटुंबे | ९५ | ४२ % |
| ६ | जाती / जमातीचा दाखला | ० | ०% |
| | एकूण ... | २२८ | १०० % |

वरील तक्त्यावरुन आकडेवारी पाहता २२८ कातकरी कुटुंबांपैकी फक्त १५ (७%) कुटुंबांकडे रेशन कार्ड आहेत. इतर कोणतेही दाखले नाहीत.

फक्त निवडणूक कार्ड असलेली ४८ (२१%) कुटुंबे आहेत. तर २६% कुटुंबांकडे रेशनकार्ड व निवडणूक कार्ड दोन्हीही आहेत. वरील कुटुंबांपैकी ४% कुटुंबांकडे रेशनकार्ड, निवडणूक कार्ड व दारिद्रय रेषेखालील दाखला अशी तीन ही कागदपत्रे आहेत.

कोणत्याही प्रकारचे दाखले नसलेली ४२% कुटुंबे आहेत. या कुटुंबांपैकी एकाही कुटुंबाकडे जातीचा / जमातीचा दाखला नाही. त्यामुळे त्यांना जातीच्या निकषावर शासकीय योजनांचे फायदे मिळत नाहीत.

कातकरी कुटुंबाकडे उपलब्ध असलेले कागदपत्रे



## मावळ तालुक्यातील कातकरी कुटुंबाचे सर्वेक्षण उपलब्ध कागदपत्रे दस्तऐवजानुसार कातकरी कुटुंबांचे वर्गीकरण

| अ.क्र. | गावाचे नाव | कुटुंबांची संख्या | कागदपत्रे दस्तऐवज असलेल्या कुटुंबांची संख्या | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | फक्त रेशन कार्ड असलेली | फक्त निवडणूक कार्ड असलेली | दारिद्र्यरेषेचा दाखला असलेली | रेशनकार्ड व निवडणूक दोन्हीही असलेली | निवडणूक कार्ड व दारिद्र्य रेषेचा दाखला | रेशनकार्ड, निवडणूक कार्ड व दारिद्र्य रेषेचा दाखला | एक ही दाखला नसलेली कुटुंबे | एकूण |
| १ | करुंज | ३० | १ | ५ | ० | १४ | ० | ७ | ३ | ३० |
| २ | शिवली | २४ | १ | ३ | ० | ४ | ० | ३ | १३ | २४ |
| ३ | पवनानगर | ४ | ० | २ | ० | ० | ० | ० | २ | ४ |
| ४ | ठाकूरसाई | २ | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | २ |
| ५ | कोथुर्णी | ७ | २ | ४ | ० | ० | ० | ० | १ | ७ |
| ६ | महागाव | ७ | १ | ० | ० | १ | ० | ० | ५ | ७ |
| ७ | मलवडी | ४ | १ | ० | ० | ० | ० | ० | ३ | ४ |
| ८ | वारु | ४ | ० | ३ | ० | १ | ० | ० | ० | ४ |
| ९ | आंबेगाव | २४ | ३ | २ | ० | ८ | ० | ० | ११ | २४ |
| १० | आपटी | ४ | ० | २ | ० | ० | ० | ० | २ | ४ |
| ११ | शिळींब | २८ | ० | ८ | ० | ३ | ० | ० | १७ | २८ |
| १२ | जवन | १८ | ० | ७ | ० | २ | ० | ० | ९ | १८ |
| १३ | कोटमवाडी | ३८ | ६ | २ | ० | ११ | ० | ० | १९ | ३८ |
| १४ | कोळेचाफेसर | ३४ | ० | ९ | ० | १५ | ० | ० | १० | ३४ |
| | एकूण ... | २२८ | १५ | ४८ | ० | ६० | ० | १० | ९५ | २२८ |

## १५. शासकीय योजना राबविण्यात येणाऱ्या अडचणी व उणिवा

मावळ तालुक्यातील सदर गावे ही आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर येत असून प्रकल्प कार्यालय, घोडेगाव यांचे अखत्यारित येतात.

प्रकल्प कार्यालयात लगतचा भाग असूनही सदर भागामध्ये कातकरींसाठी कल्याणकारी योजना राबविण्यात आलेल्या नाहीत. याबाबतची कारणे खालीलप्रमाणे आहेत :--

(१) आदिवासींसाठी वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यासाठी जमातीचा / जातीचा दाखला आवश्यक आहे. मावळ तालुक्यातील कातकरी हे स्वत:च्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी स्थलांतरित असल्याने त्यांना मावळ तहसिल कार्यालयाकडून जातीचे दाखले मिळत नाहीत. यासाठी मागील ५० वर्षे वास्तव्याची जाचक अट विचारात घेऊन दाखले नाकारले गेले आहेत. त्यामुळे जातीचे प्रमाणपत्र नसल्याने योजनेचा फायदा प्रकल्प कार्यालयाकडून मिळत नाही.

(२) **प्रसिध्दी व प्रचार ( अभाव ).--** आदिवासींना (कातकरींना) शासनाकडून मिळणारे फायदे त्यांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकास होण्यासाठी ज्या योजना राबविल्या जातात त्यांची प्रसिध्दी व प्रचार होणे आवश्यक आहे.

(३) **दळणवळणाचा अभाव.--** मावळ तालुक्यातील बहुसंख्य कातकरी हे डोंगराच्या पायथ्याशी राहतात. त्या ठिकाणी दळणवळणाच्या सोई उपलब्ध नाहीत. त्यामुळे योजना राबविण्यात अडचणी येतात.

(४) **शिक्षणाचा अभाव.--** बहुसंख्य कातकरी हे अशिक्षित असल्याने त्यांना योजनांची माहिती तसेच संबंधित दस्तऐवज गोळा करणे तसेच दस्तऐवजाचे महत्त्व याबाबत गांभीर्य नसते.

(५) **दूरदृष्टीचा अभाव.--** कातकरी जमातीत दूरदृष्टीचा अभाव आहे. आजचे आज उद्याचे उद्या अशी त्यांची वृत्ती. त्यामुळे भविष्याबाबत गांभीर्य नाही. भविष्य काळासाठी कोणतेही नियोजन नाही. नवीन बाबी, माहिती जाणून घेणेबाबत निरुत्साही त्यामुळे योजना राबविण्यासाठी कातकरींकडून सहकार्य मिळत नसल्याने अधिकारी वर्गाकडून या भागातील कातकरींच्या विकासाकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे आढळून आले.

(६) **व्यसनाधिनता.--** कातकरी पुरुष हा नित्तनियमाने दारु पितो. बहुतांशी कातकरी कुटुंबातील पती पत्नी हे दारु पितात. या व्यसनावर त्यांच्या उत्पन्नातील बराच भाग खर्च होतो त्यामुळे कायम आर्थिक टंचाई, दारिद्र्य, त्यामुळे योजनेची मुलभूत रक्कम भरण्याची शक्यता नाही.

(७) **आर्थिक अस्थिरता.--** अनियमित रोजगार त्यामुळे आर्थिक अस्थिरता त्यामुळे योजनेच्या रक्कमेतील नियमानुसार काही मूळ रक्कम भरणे कातकरींना अशक्य आहे.

(८) **स्वभाव.--** कातकरींचा स्वभाव मूळत: बुजरा, अबोल त्यामुळे बाहेरील लोकांशी इतर समाजाशी त्यांचा जास्त संपर्क नसतो तसेच अधिकारी वर्ग बहुजनांशी दूर राहतात. त्यामुळे त्यांचेशी संपर्क करुन त्यांना योजनांची माहिती देणे, योजना कशी फायदेशीर आहे याबाबतची सविस्तर चर्चा करणे अवघड जाते.

## १६. कामावर होणारी फसवणूक व पिळवणूक


शिक्षणाचा अभाव, बेघर, कोणतीही स्थानिक मालमत्ता नाही. अनिश्चित रोजगार त्यामुळे सर्व कातकरी कुटुंबे शेतमजुरी व मोलमजुरी करताना आढळली.


(१) शेतमजुरी किंवा विटभट्टीवर काम करताना ज्याचे घरी / शेतात / विटभट्टीवर काम करावयाचे त्याचेच जागेत राहायचे त्यामुळे स्थानिक मालकांकडून कमी रोजंदारीवर कामे करून घेतली जातात. दुसरीकडे कामावर जाण्यास प्रतिबंध केला जातो. झोपड्या खाली करून घेण्याची धमकी दिली जाते.

(२) स्थानिक मालक त्यांचे घरातील जनावरे सांभाळणे, पाणी आणणे, किरकोळ कामे ही कातकरी कुटुंबातील लहान मुलांकडून करून घेतात. प्रत्यक्षपणे बाल कामगार म्हणून काम करतात. त्यामुळे शिक्षणाऐवजी मजुरी करण्यात त्यांचे लहानपण जाते. याची घरमालक दखल घेत नाही. मुलांचे अंगावर फाटके कपडे, पायात चप्पल नाही, महागाईमुळे डोक्याचे केस कापलेले नाहीत, डोक्याला तेल नाही, दातांना मंजन नाही, पौष्टीक अन्न नाही, अशा परिस्थितीत मुलांची अवस्था किती भीषण आहे हे वास्तववादी चित्र कातकरींच्या बाबतीत मावळ तालुक्यात सर्व ठिकाणी आपणास पहावयास मिळते.


१. आर्थिक फसवणूक
२. मानसिक छळवाद
३. बाल कामगार
४. स्त्रियांचे शोषण
५. बेघर करण्याची धमकी
६. मारहाण करण्याची धमकी
७. सावकाराकडून पिळवणूक

अभ्यास पथकातील अधिकारी माहिती घेत असताना






अभ्यास पथकातील अधिकारी माहिती घेत असताना



पोलीस दक्षता पथकातील अधिकारी माहिती घेत असताना



पोलीस दक्षता पथकातील अधिकारी माहिती घेत असताना



# परिशिष्टे

महाराष्ट्र शासन
# आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
२८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११ ००१
(Government of Maharashtra)
Tribal Research and Training Institute
28, QUEENS GARDEN, PUNE 411 001

सत्यमेव जयते

## गावपत्रक

## कातकरी समाजासाठी गावात असलेल्या सामाजिक सुविधा बाबतची माहिती

गावाचे नाव : 　　　　　　　　　　　　तालुका :

जिल्हा :

| | | |
|---|---|---|
| १. | गावातील कातकरी समाजासाठी असलेल्या सामाजिक सूविधा | |
| | (१) समाज मंदिर | |
| | (२) स्मशान भूमी | |
| | (३) पिण्याच्या पाण्याची सोय स्त्रोत | |
| | (४) पिण्याचे पाणी उपलब्ध (अंतर) किमी | |
| | (५) | |
| | (६) | |
| २. | गावातील बहुतांशी कातकरी समाजाचा व्यवसाय | |
| ३. | गावातील कातकरी सामाजाच्या वस्तीमधील सुविधा | |
| | (१) पिण्याचे पाणी | स्त्रोत व अंतर |
| | (२) विद्युत | |
| | (३) अंतर्गत रस्ता | बारमाही / कायम /प्रकार |

| | | |
|---|---|---|
| | (४) गटार | |
| | (५) शौचालय | |
| | (६) इतर | |
| ४. | स्थानिक स्वराज्य संस्थेवर कातकरी समाजातील प्रतिनिधीच्या झालेल्या नेमणूका (गावातून) | (१) ग्रामपंचायत - सरपंच सदस्य |
| | | (२) पंचायत समिती सदस्य |
| | | (३) जिल्हा परिषद सदस्य |
| | | (४) इतर |
| ५. | सहकारी संस्थामध्ये कातकरी समाजातील प्रतिनिधीत्व बाबतची माहिती | |
| ६. | इतर माहिती | |

## मावळ तालुक्यातील कातकरी जमातीचे असल्याचा दावा करणाऱ्या कुटुंबाचे सर्वेक्षण

### कुटुंबपत्रक - 'अ'

गावाचे नाव : तालुका : जिल्हा :

| | | |
|---|---|---|
| १. कुटुंब प्रमुखाचे नाव<br>(सर्व सदस्यांचा तपशील 'ब' पत्रकात आहे) | | |
| २. कुटुंबाचे मूळ गाव -<br>(कायम रहिवाशी असलेले गाव) | | |
| ३. कायमच्या रहिवाशी गावातील कुटुंब रहात असलेल्या घराची स्थिती | | |
| (१) घराचा प्रकार :-- | | कच्चे / झोपडी / मंगलोर / कौलाची झोपडी / पत्र्याचे/ आरसीसी |
| (२) घराची मालकी :-- | | स्वत:ची / भाड्याची / इतर व्यक्तीची / गावाची / गावठाण |
| (३) राहत्या घराचे क्षेत्रफळ | | चौ. फूटामध्ये |

४. कुटुंबाकडे शेतजमीन असल्यास त्याची माहिती

| अ. क्र. | बाब/प्रकार | मालकीची जमीन | | खंडाची जमीन | | वनविभागाची जमीन | | इतर | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | हेक्टर | आर | हेक्टर | आर | हेक्टर | आर | हेक्टर | आर | हेक्टर | आर |
| १ | जिरायत | | | | | | | | | | |
| २ | बागायत | | | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| ५. कामासाठी / इतर कामांसाठी मूळ गाव सोडून इतर ठिकाणी गेले असल्यास मूळ गाव केव्हा सोडले ? | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | गाव सोडण्याचे कारण | | |
| ६ | कामासाठी / इतर ठिकाणी गेले असल्यास त्या ठिकाणी सध्या राहत असलेल्या ठिकाणचा संपूर्ण पत्ता: | | |
| ७ | त्या ठिकाणी केव्हापासून रहात आहेत ? | | |
| ८ | त्या ठिकाणी वर्षातून सुमारे किती कालावधीसाठी रहात आहेत ? | | महिने |
| ९ | याशिवाय इतर काही ठिकाणी कोणत्याही कारणास्तव राहत असल्यास ते ठिकाण, कालावधी व कारण | | ठिकाण -<br>कालावधी व कारण - |
| १० | कुटुंबाचे जातीचे /जमातीचे नाव | | |
| ११ | पोट जात / जमात असल्यास पोटजातीची / जमातीची नावे | | |
| १२ | जातीच्या लोकांचे वास्तव्य असलेल्या जिल्हा, तालुका, गाव, शहरे यांची नावे | | |
| १३ | कायमच्या राहत असलेल्या गावात कोणकोणत्या जाती / जमातीचे लोक राहतात. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | कुटुंबाचे जाती / जमातीचा पारंपारिक व्यवसाय (जुना पारंपारिक व्यवसाय काय होता ?) | | |
| १५ | कुटंबाचे जाती / जमातीची मातृभाषा | | |
| १६ | जाती / जमातीचे सामुहिक स्थळ आहे का ? असल्यास त्याची माहिती | | |
| १७ | जाती / जमातीचा<br>(१) पारंपारिक पोषाख<br>(२) आहार<br>(३) भाषा<br>(४) कलाकृती<br>(५) परंपरा<br>(६) बाळंतपण सोयरे | १<br><br>२ | पुरुष :--<br><br>स्त्रिया :-- |
| १८ | कुटुंबातील सर्व नातेवाईकांची आडनावे | | |
| १९ | नातेवाईक कोणकोणत्या तालुक्यात आहेत. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २० | जाती / जमातीचे प्रमुख<br>(१) सण<br>(२) उत्सव<br>(३) पितरसण | | |
| २१ | जाती / जमातीचे देवदेवता | | |
| २२ | जाती / जमातीचे धार्मिक विधी (प्रत्येकाचे सविस्तर तपशील द्यावे.) | | |
| | अ. जन्माबाबत | | |
| | ब. लग्नाबाबत<br>१. धार्मिक विधी<br>२. दहेज / हुंडा<br>३. लग्न संबंध | | |
| | क. मृत्युबाबत (सविस्तर तपशील द्यावे.)<br>१. मृताच्या प्रेताचा विधी (दहन / दफन)<br>२. सुतक<br>३. मृत्युनंतर करायचे विधी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | जाती / जमातीचे पारंपरिक नृत्य<br>(सविस्तर तपशील द्यावे.) | | |
| २४ | जाती / जमातीमधील प्रमुख व्यसने | | |
| २५ | जाती / जमातीची पंचायत आहे का ?<br>(सविस्तर तपशील द्यावे.) | | |
| २६ | असल्यास, पंचायत प्रमुखास काय म्हणतात व त्यांचे संपूर्ण नाव | | |
| २७ | जाती / जमातीमधील औषधोपचार पध्दती | | |
| | (१) पारंपरिक वनौषधी | | |
| | (२) घरगुती उपचार | | |
| | (३) भगत (ओझा) | | |
| | (४) दवाखाना | | |
| | (५) दवाखान्यात कोणकोणत्या कारणांसाठी जाता ? | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उपचारा-बाबत | जातं नाही | आजारपणावर उपचार | लसीकरणा-साठी | बाळंतपणा-पूर्वीच्या तपासणीसाठी | बाळंपणा-साठी | कुटुंब नियोजना-साठी | आरोग्य सल्ला |
| | | | | | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| २८ | समाजात होऊन गेलेल्या प्रसिद्ध व्यक्ती / संत/ साहित्यिक इत्यादी त्यांची नावे | | |

माहिती देणाऱ्याची सही
( कुटुंब प्रमुख व कुटुंबातील सदस्य )

माहिती घेणाऱ्याची सही

संपूर्ण नाव :

संपूर्ण नाव व पदनाम

१.

२.

३.

४.

५.

स्थळ :

दिनांक :

## कातकरी म्हणून दावा करणाऱ्या कुटुंबातील सर्व सदस्यांची माहिती

## कुटुंबपत्रक - 'ब'

गावाचे नाव :

तालुका :

जिल्हा :

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कुटुंब प्रमुख व कुटुंबातील सर्व सदस्यांची माहिती | | | | | | | |
| | अ.क्र. | नाव | स्त्री/ पुरुष | कुटुंब प्रमुखाशी नाते | वय | शिक्षण | प्रमुख व्यवसाय | पूरक व्यवसाय |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| २ | शिक्षणविषयक | | | | | | | |
| | (अ) कुटुंबात शिक्षण घेणारी मुले आहेत काय ?<br>**कुटुंबात शिक्षण घेणारी मुले असतील तरच खालील ब मध्ये माहिती द्यावी.** | होय / नाही | | | | | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ब | शाळेत जाणारी मुले | | | | | | | | | |
| | अ.क्र. | शाळेचा प्रकार | वयोगट | | | | | | एकूण | |
| | | | ३ ते ६ | | ७ ते ११ | | १२ ते १६ | | मुले (स्तंभ ३ + ५ + ७) | मुली (स्तंभ ४ + ६ + ८) |
| | | | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | | |
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | १ | जिल्हा परिषद शाळा | | | | | | | | |
| | २ | खाजगी शाळा | | | | | | | | |
| | ३ | शासकीय आश्रमशाळा | | | | | | | | |
| | ४ | अनुदानित आश्रमशाळा | | | | | | | | |
| | | एकूण ... | | | | | | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | कुटुंबाकडे असलेली स्वत:चे मालकीची मालमत्ताबाबतची माहिती | | |
| | | अंदाजित क्षेत्र (एकर) | अंदाजित किंमत |
| | (अ) स्वत:चे मालकीची शेतजमीन | | |
| | (ब) स्वत:चे मालकीचे घर | (चौफूट) | |
| | (क) पशुधन (संख्या लिहाव्यात) | गाय / म्हैस / शेळी / मेंढी | |
| | (ड) कोंबड्या कुकुट (संख्या लिहाव्यात) | | |
| | (इ) इतर मालमत्ता | अंदाजित किंमत | |
| | (अ) सायकल | | |
| | (ब) मोटार सायकल | | |
| | (क) | | |
| | (ड) | | |

| | |
|---|---|
| ४ | कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न |
| | (अ) कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न (साधननिहाय) |

| | साधन | शेती | दुग्धव्यवसाय | शेतमजुरी | नोकरी | व्यवसाय | जंगलमजुरी | इतर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उत्पन्न रुपयात | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| ५ | कुटुंबाचा **प्रमुख व्यवसाय** (व वर्षातील अंदाजे किती महिन्यात प्रमुख व्यवसाय केला जातो) | |
| ६ | कुटुंबाचा पूरक व्यवसाय ( व वर्षातील अंदाजे किती महिन्यात हा पूरक प्रमुख व्यवसाय केला जातो) | |
| ७ | कुटुंबाचे प्रमुख व्यवसायापासूनचे मिळणारे अंदाजे मासिक उत्पन्न | अंदाजे मासिक उत्पन्न रुपये |
| ८ | कुटुंबाचे पूरक व्यवसायापासूनचे मिळणारे अंदाजे मासिक उत्पन्न | अंदाजे मासिक उत्पन्न रुपये |
| ९ | कुटुंबाचे अंदाजित एकूण मासिक उत्पन्न ( अ. क्र. ७ + ८ ) | |
| १० | कुटुंबाकडे असलेले शासकीय दाखले / दस्तऐवज | |

| | | होय / नाही | क्र. |
|---|---|---|---|
| | (१) रेशन कार्ड | | |
| | (२) जातीचा दाखला | | |
| | (३) मतदान ओळखपत्र | | |
| | (४) दारिद्र्य रेषेखालील दाखला | | |
| | (५) | | |
| | (६) | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | शासकीय योजनांचा लाभ घेतला आहे का ? | | होय / नाही |
| १२ | असल्यास, तपशील द्यावा | | |
| १३ | शासकीय योजनांचा लाभ न मिळण्याची कारणे | | |
| | अ. क्र. | कारणे | |
| | १ | योजनांची माहिती नसणे | |
| | २ | कागदपत्रांची पूर्तता करण्यास असमर्थता | |
| | ३ | अंमलबजावणी अधिकाऱ्यांकडून उदासिनता | |
| | ४ | योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असणारी रक्कम न भरता येणे | |
| | ५ | योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक पात्रता नसणे | |
| | ६ | योजनेचा लाभ मिळण्यासाठी होणारी दिरंगाई व आर्थिक नुकसान | |
| | ७ | इतर | |
| १४ | कुटुंबातील कोणी सदस्य शासकीय / निमशासकीय सेवेत आहे काय व त्याचे कुटुंबाशी नाते | | होय / नाही |
| १५ | शासकीय सेवेत असल्यास त्याचे पद / संस्था वेतन याचा तपशील द्यावा | | |
| १६ | कामावर (मोलमजुरी इत्यादी करीत असताना) त्याची फसवणूक होते का ? ( असल्यास कोणत्या प्रकारची, कोणाकडून इत्यादीबाबत तपशील ) | | |

माहिती देणाऱ्याची सही
( कुटुंब प्रमुख व कुटुंबातील सदस्य )

माहिती घेणाऱ्याची सही

संपूर्ण नाव :

१.

२.

३.

४.

५.

संपूर्ण नाव व पदनाम

स्थळ :

दिनांक :

परिशिष्ट - 'ब'

महाराष्ट्र शासन

क्रमांक : एसटीसी--१०९८ / प्र. क्र. ९२ / का. १०
आदिवासी विकास विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २३ मार्च १९९९.

प्रति,

जिल्हाधिकारी,
रायगड, ठाणे, मुंबई, पुणे, नाशिक, अहमदनगर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी,

प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
पेण, शहापूर, जव्हार, डहाणू, गोरेगाव (मुंबई), घोडेगाव, राजूर, नाशिक, कळवण.

विषय : काथोडी, कातकरी, ढोर कातकरी, सोन काथोडी, सोन कातकरी या अनुसूचित जमातींना जातीचे दाखले देण्याबाबत.......

अखिल भारतीय आदिवासी सेनेच्यावतीने दिनांक ८ सप्टेंबर १९९८ रोजी मोर्चा काढून त्यांच्या शिष्टमंडळाने दिनांक ८ सप्टेंबर १९९८ रोजी मा. मंत्री, आदिवासी विकास यांची भेट घेतली व त्यांच्या मागण्यांच्या संदर्भात सविस्तर चर्चा केली. त्यांच्या मागण्यांमध्ये जातीच्या दाखल्याच्या अटी शिथिल कराव्यात अशी मागणी केली होती. या मागणीवर विचार करुन असे निदेश देण्यात येत आहेत की, अनुसूचित जमातीच्या व्यक्तींना जातीचे दाखले देताना सक्षम प्राधिकाऱ्यांनी कोणत्या बाबीचा विचार करावा. या संदर्भात **शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक एसटीसी--१६९६ / प्रक्र. ३४/का-१०, दिनांक ७ मार्च १९९६ सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे सूचना देण्यात आलेल्या आहेत.** मात्र काथोडी, कातकरी, ढोर काथोडी, ढोर कातकरी, सोन काथोडी, सोन कातकरी ह्या जमातीच्या व्यक्ती जातीच्या नोंदी असलेले कागदपत्रे उदा. शाळा सोडल्याचा दाखला, कायम रहिवासी असल्याचा दाखला, जन्म-मृत्युच्या नोंदी व महसुली विभागातील नोंदी ग्राबाबतची कागदपत्रे ते उपलब्ध करुन देवू शकत नाही. म्हणून त्यांना कोणत्याही सवलती जातीच्या दाखल्याअभावी प्राप्त करता येत नाही. जातीचा दाखला मिळावा म्हणून वरील जमातीच्या व्यक्तींनी तहसिल कार्यालयात अर्ज सादर केल्यावर संबंधित तहसिल कार्यालय ज्या एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात असतील त्या कार्यालयाशी संपर्क साधून त्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांचे सहकार्य घेऊन वरील समाजाच्या वाड्यांवर जाऊन दाखले मागणारी व्यक्ती ही वरीलप्रमाणे नमूद केलेल्या अनुसूचित जमातीची आहे असे प्रमाणित करुन घेऊन त्यांनी त्याबाबतची कागदपत्रे संबंधित तहसिल कार्यालयाला सादर करुन त्यांना जातीचे दाखले मिळवून देण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. संबंधित गावात काथोडी, कातकरी, ढोर कातकरी, सोन काथोडी, सोन कातकरी या जमातीच्या समाजाचे **सरपंच** किंवा **पंचायत सदस्य पोलीस पाटील** असल्यास त्यांनी दिलेले दाखलेदेखील जातीचे प्रमाणपत्र देण्यास ग्राह्य धरण्यास हरकत नसावी. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांनी कातकरी, काथोडी, ढोर कातकरी, ढोर काथोडी, सोन कातकरी, सोन काथोडी या जमातीच्या ज्या व्यक्तींना जातीचे दाखले मिळवून दिले त्याबाबतचा अहवाल पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत शासनास सादर करण्याची कार्यवाही करावी. ही सवलत फक्त कातकरी या आदिम जमातीकरिताच लागू करण्यात येत आहे.

**( स. नु. गावीत. )**
शासनाचे अवर सचिव.

---

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-६